म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
वा. नं. १३८४
१९५१०

REFBK-0009391
REFBK-0009391


प्रतिज्ञापूर्ति
खंड काव्य
देवकन्या पुष्प ३ रें
— श्री. रा. देव
M.S ART. POONA

देव कन्या पुष्प ३ रें

# प्रतिज्ञापूर्ति

( खंड काव्य )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... किं ...
क्रमांक ... नों: दि: ...

लेखक

श्री. श्री. रा. देव, ( धाराशिव )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

— प्रस्तावना —

लोकनायक श्री. मा. श्री. अणे

REFBK-0009391
REFBK-0009391

★

प्रथमावृत्ति ] [ किंमत १। रुपया

-: प्रकाशक :-

श्री. रा. देव

'देवनिवास'

धाराशिव, (अुस्मानाबाद)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति

महाशिवरात्र शके १८७८

२७ फेब्रुवारी १९५७

--: मुद्रक :--

च. वि. आपटे, बी.कॉम्.

हिंदुस्थान मुद्रणालय,

८६५ सदाशिव पेठ, पुणें २

# अर्पण पत्रिका

बालपणींच पितृवियोगामुळें, अनाथ झाल्याने परम पूजनीय

मातोश्री ती. मैनाबाई देव

व

आजोबा पूज्य सखाराम शास्त्री दीक्षित

नाशिककर

—: यांच्या :—

कृपाछत्राखालीं वाढलों, त्या

उभयतांच्या पूज्य

च र णीं

ही कृति समर्पण

( वृत्तः—पृथ्वी )

अनाथ जंव जाहलो जनक मृत्युच्या आपदें
तदा जनजिनें मला विपदि दाविलीं सत्पदें
दयार्द्र जननी-पिता, करि दया सखारामही
समर्पण कृती करी, उभयतां पदी देवही

देवनिवास
धाराशिव

श्री. रा. देव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांतर
अनुक्रम २१९२२ ... वि: ...
क्रमांक ...१३५८... नों: दि: ...

# *अभिप्राय*

## ‘ प्रतिज्ञा पूर्तीच्या वाटेंत ’

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ...
शाखा

ले. कवि यशवंत, पुणें

मराठवाड्यांतील धाराशिव येथील सुप्रसिद्ध कवि श्री. श्री. रा. देव यांनीं आपल्या ‘ प्रतिज्ञापूर्तीच्या ’ वाटेंत मला कां उभें करावें हें कळत नाहीं; कारण येथें वाटाड्याची गरजच नाहीं.

रानावनांत दडून बसण्यापर्यंत नायक व नायिका यांचेवर प्रसंग गुदरला असला तरी कुठून या गहन काननांत शिरलो, असा मनःस्ताप या काव्याच्या वाचकांस वाटणार नाहीं.

**श्री. देव यांची लेखनशैली इतकी स्वच्छ व सुबोध आहे.**

श्री. देवांची कांहीं ही पहिलीच “ देवकन्या ” नाहीं. या नांवाचे दोन कविता संग्रह (पुष्प १ ले) व (पुष्प २ रे) डॉ. शं. दा. पेंडसे (साहित्य संमेलनाध्यक्ष) नागपूर, श्री. लोकनायक माधव श्रीहरी अणे, श्री. प्रा. शं. वा दांडेकर, प्रसाद पुणें, अशा थोर विद्वानांच्या प्रशंसेस या पूर्वीच प्राप्त झालें आहेत. प्रस्तुत ‘ देवकन्या ’ आडनांवामुळें देवकन्या असली तरी गुण-धर्मानें तिच्या पित्याप्रमाणेंच या खंड काव्यांतील ‘ मुनिकन्या ’ म्हणूनच शोभण्यासारखी आहे.

श्री. देवांचें हें तिसरें अपत्य होय. देशकाजास्तव, तरुण तरुणींची तळमळ–जनतेची निरयगति–ती लोकजागृति–वगैरे सर्व कांहीं वातावरण अद्‌भुतरम्य आहे.

रम्य कल्पनेंत रममाण होण्याचें संस्कारच तिच्यांत दृढ झालेलें दिसतात, आणि म्हणूनच कांहीं कांहीं गोष्टी काव्यशास्त्राच्या प्राचीन संकेतांतून इथें रंगारुपाला आलेल्या आहेत.

या काव्यांत अस्तोदय आहेत. भिन्न भिन्न ऋतुमानांचा यांत सुंदर विलास आहे.–धो धो, पडणाऱ्या पावसाच्या आकस्मिकतेनें ओढवलेलें महान संकट आहे. थंडीच्या कडाक्यानें उडालेल्या दुर्दशेचें उत्कृष्ट शद्बचित्र आहे.

**गृहस्थाश्रमाचे आदरातिथ्य, तसेंच साधुसंतांचें परोपकारी उज्वल जीवन उत्कृष्टपणें श्री. देवांनीं रंगविलें आहे.**

हें, जें, सारें आलेलें आहे, तें विविधतेनें, वैचित्र्य साधण्यासाठीं जसें आलें आहे, तसेंच कथानकात्मक खंडकाव्याच्या सांकेतिक अपेक्षानुसार आलें असेल.

★ 'देशाचें दैन्य व पारतंत्र्य नष्ट झाल्याशिवाय विवाहबद्ध व्हावयाचें नाहीं.' या प्रतिज्ञेनें बद्ध झालेलें, प्रेमिक व त्यांची प्रणयिनी हीं कोणत्या काळांतील ? असा प्रश्न वाचकांना पडेल, त्याचें उत्तर पुढील ओळींत आहे. ★

" असुर माजले होते जगतीं अेकच हाःहाःकार
दिवसा ढवळ्या करीत होते, कपटी अत्याचार
आज पळविली स्त्री दुष्टानें, काल घेतला जीव
अपराधाविण कितीक छळलें, मनीं दया ना कींव
अन्नावांचुनि कितीक मरती, चाले यांची चैन
दीपावलि ती थोर नृपांना, रंका, अन्न न पान

कवि श्री. देव हे धाराशिवचे रहाणारे, हें लक्षांत घेतल्यास, कोणत्या कालमानाचें चित्राचें प्रतिबिंब यांत पडलें आहे, हे निझामशाहींतील घडामोडी बद्दल जागरुक असलेल्या वाचकांना सहज समजून येईल.

आणखीहि पुरावा हवा असल्यास खालील ओळी पहा—

" दीन बोलला काय कथूं मी, होतो शेतकरी
शेती करुनी कंठित होतो, जीवन दोघें आम्ही
अेके दिवशीं राजसेवकें धरुनी नेलें आम्हां
म्हणे " साक्ष दे विरुद्ध खोटी, ना तरि कापूं माना "
प्रयत्न केले छळूनि मजला, विरुद्ध द्याया साक्ष
परि मी वदलो " मला नावडे अन्यायाचा पक्ष

क्रोध अनावर झाला त्याचा, केला अत्याचार
अन्नवस्त्र, वस्त्र, धन, लुटोनि नेले, होतें तितुकें पार

यांतून अेक गोष्ट दिसून येतें ती ही की श्री देवांना, कांहीं मूल्यांची कदर असून, तीं प्रस्थापित करण्याचा त्यांचा कटाक्ष असावा.

सत्यासत्याचा निवाडा मागणाऱ्या द्रौपदीच्या आर्द्र हांकेला ओ देण्याची धमक भीष्म, द्रोणालाहि झाली नाहीं; पण या कथेंतला एक गरीब शेतकरी, सुलतानी कोप ओढवून घेऊन, आपलें सर्वस्व गमावतो, पण खोटी साक्ष देत नाहीं; हें वरील अवतरणावरून सिद्ध होतें.

' स्वातंत्र्य ' हें मूल्य तर या देवांच्या काव्याचा पाया आहे.

" इच्छा पतिची पूर्ण करावी, हाच धर्म भार्येचा
स्वदेश सेवा करोनि राखिन, धर्म मीच आर्याचा
विद्वत्तेहुनि, मान मान्यता शीलातें, हो ! अधिक
' शील राखणें,' आर्यांचें हें, ब्रीद असें खचित "

अशा सारखी आणखी अवतरणें देऊन हें मूल्य संगोपन या देवांच्या उत्कृष्ट काव्यांतून सिद्ध करतां येईल.

" संसारी या राहुनि जो कां, मोहपाशि ना फसला
साधु खरा तो असे संयमी, कर्तव्यीं ना ढळला
जनसेवा ही, परमेशाची सेवा खरी गणावी
जनीं राहुनी असली सेवा कैशी सांग घडावी
सुखी करावें, श्रमें जगासी, झिजवुनि अपुली काया
मानवतेचा, हाच धर्म की, प्रभुते याच भजाया "

या वरील अवतरणांत मानव्यावरील निष्ठा उत्तम प्रकारें प्रस्थापित झाली असून, अशा सारखीं सुभाषितें श्री. देवांच्या सकस व उदात्त विचार-सरणीवर स्पष्ट प्रकाश टाकणारीं आहेत.

कवीची भाषाहि मग तदनुषंगानें ओज प्रकट करिते.

श्री. देवांच्या काव्यांत काव्यसौंदर्य व रम्य कल्पना ठिकठिकांणीं दिसून येतात.

या काव्यांतील नायिका अत्यंत तेजस्वी आहे; कारण

लोक जागृति करण्यांत तिला चांगलें यश आलें आहे

अशा नायिकेच्या किंवा नायकाच्या आणखी कांहीं कर्तृत्वाचा व बुद्धि चातुर्यादि गुणांचा कांहीं साक्षात्कार घडावा, असें त्यांचें कांहीं तरी कर्तृत्व कवीनें दाखविलें असतें तर जास्त बरें होतें, असें कांहींसें वाचकांच्या मनांत तरळून गेल्याशिवाय रहाणार नाहीं.

नदींत दोघांनीं अकस्मात बुडणें, त्यांना तपस्व्यानें बाहेर काढणें आणि तो तपस्वी तिच्या प्रियकराच्या शोधार्थ गेला असतां, चंद्रिकेनें अधीरतेनें त्याच्या कुटींतून पसार होणें, यांत त्या पात्रांचा थोडासा अविवेक दिसून येतो.

आणि हें तरी कां झालें ? तर अद्‌भूत रम्य कल्पनेचा प्रभाव व वरचष्मा कवीच्या मनोलोचनावरून बाजूला होत नाहीं, म्हणून, असो.

★ सेवानिवृत्तिनंतर या उतार वयांतहि श्री. देव इतकी सुंदर ☆ रचना करतात, हें अत्यंत भूषणावह आहे; आणि त्यांतहि कांहीं विशिष्ट ध्येयवादानें त्यांची लेखणी प्रस्फूर्त आहे, हें खरोखरीच अभिनंदनीय आहे.

० ० ० ० ० ०

—२—

ले. अ. ज्ञा. कुलकर्णी

एम. ए., बी. टी. तुळजापूर

'संस्कृत सुभाषितात म्हटल्याप्रमाणें काव्यानंद मिळाल्यास राज्य प्राप्तीची सुद्धां तमा नाहीं.'

कवि. श्री. श्री. रा. देव धाराशिव (मराठवाडा) यांचा प्रतिज्ञापूर्ति हा काव्यसंग्रह (देवकन्या पुष्प ३ रें) मीं संपूर्ण वाचला.

या काव्यांत अभ्दुतरम्य कथानक आहे. कथानकाला ओघ आणि गति आहे.

काव्य वाचतांना, वाचक, कथानकाकडे आकर्षिला जातो. त्यांत पकड आहे.

' प्रतिज्ञापूर्ति ' या काव्यांत शृंगार आहे, पण तो प्रतिष्ठित व संयमित असून पराक्रमाच्या सांगातीं आहे.

देशप्रेम व स्वातंत्र्य काव्याचा केन्द्रबिंदु आहे. यांत अन्यायाची चीड आहे, पारंतंत्र्याची धृणा आहे.

जनशक्तीचें सामर्थ्य प्रभावीपणें तळपत आहे. निसर्गाचें सान्निध्य प्रकर्षानें प्रकट केलें आहे. त्यापेक्षांहि मानव्यावरील निष्ठा उत्तमप्रकारें प्रस्थापित केलीं आहे.

काव्यसौंदर्य विपुल आहे. कांहीं कल्पना फारच रम्य व तेजस्वी आहेत.

काव्यांत ओज, माधुर्य व प्रसाद आहे. शृंगार, करुण, व वीर रस प्रसंगोपात् उत्कृष्ठ साधलें आहेत.

अेका कवीनें म्हटलें आहे–– "Poetry is not to be taught- but it ought to be Caught" हें येथें म्हणावेसें वाटते.

काव्य सर्वच दृष्टीनें उत्कृष्ट वठलें आहे. श्री. देव कवींचें हें (खंडकाव्य) पुष्प २ रें मराठी वाङमयांत बरेंच उच्च स्थान मिळवील व मराठी भाषेंत सदैव तळपत राहील यांत मुळींच शंका नाहीं.

० ० ० ० ० ०

—३—

**श्री. मुरलीधरराव घाणेकर**

डे. डायरेक्टर शिक्षण खाते (मराठवाडा विभाग) औरंगाबाद.

मराठवाड्यांतील (उस्मानाबाद) धाराशिव येथील प्रसिद्ध कवि व कीर्तनकार श्री. रा. देव देवकन्या पुष्प १ ले श्री. संत भटजी बापू महाराज (देवकन्या पुष्प २ रें) हें यांचें जनक, यांचें 'प्रतिज्ञापूर्ति' (खंडकाव्य) हें तिसरें अपत्य होय.

या काव्यावर अभिप्राय देतांना त्याचे मी दोन विभाग पाडतो.

(१) कथानक (२) काव्यगुण

**कथानक–**

कथानकासंबंधानें लिहावयाचें तर खंडकाव्य लिहीत असतांना, भावनांचा वेग, व भावांचा प्रक्षोभ सतत तेवत ठेवून भागत नाहीं तर कथानकांतील प्रसंग संविधानकाच्या दृष्टीनें ग्रथित केलेसे असावेत, आणि स्वभाव परिपोष कथानकातील सहजप्राप्त घटनांतून अकृत्रिमपणें होत गेलेला असावा कथानकांतील नायक चंद्र व नायिका चंद्रिका यांच्या मनाची घडण मानसशास्त्रातील प्रमेयास धरून असावी.

ज्या समाजाचें हें चित्र आहे तो समाज आपल्या दृष्टीसमोर उभा रहावा.

मी असें लिहिले असलें तरी हें सर्व कथानकासंबंधीं व कथानकाच्या जडण घडणासंबंधीं माझे व्यक्तिशः मत आहे.

**काव्यगुण –**

आता काव्यगुण या दृष्टीनें पहावयाचें तर श्री. देव यांच्या या खंडकाव्यात, गतिशीलता आहे. ओघ आहे. प्रवाह आहे, शब्दसौष्ठव आहे, वर्णनमाधुर्य आहे. अर्थगांभीर्य आहे, प्रतिभा आहे. स्वभावोक्ति आणि अर्थांतरन्यास प्रामुख्यानें आणि सहज सुन्दरपणें साधले आहेत.

वीर पुरुषाचें आणि वीर रमणीचें प्रतिनिधित्व करणारे चंद्र, चंद्रिका यांचा गौरव श्री. देवांनीं योग्य पण मोजक्या शब्दांत केला आहे.

वीररस तर सहज सुन्दर साधला आहे. ( सर्ग ४ था ओळी २८ ते ४० पहा ) ( त्याचप्रमाणें सर्ग ४ था ओ. ४३ ते अखेर सर्ग ) यांत आर्य स्त्रीच्या समरसतेचें, शीलाचें, वर्णन फारच सुंदर व रसभरित झालें आहे.

वृत्त 'साकी' गेयहि आहे व त्यांतील पदरचनेंन इष्ट तें सौष्ठव व माधुर्यहि भरलें आहे.

भाषा प्रसंगानुकुल असून काव्यांत प्रसाद आहे. व करुण वीररसाचें मिश्रण प्रमाणबद्ध आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१९२२ वि: का०व्य
क्रमांक ...... नों: दि: २१।६।५४



आश्रमांतील राहाणी, नदीतील विहार, वादळाचें थैमान, त्यांत दोघांचें प्रेममय जीवन इत्यादि वर्णनें हृदयाचा ठाव घेणारीं आहेत.

अेका वाक्यांत अभिप्राय द्यावयाचा तर असें म्हणतां येईल कीं खंडकाव्यातील कथानक साधारण, पण त्यांतील काव्य भाग उत्कृष्ट आहे. श्री. देवांच्या या कृतींत काव्यसौंदर्यादि गुण विपुल आहेत. त्यांची मोजदादही, मी करून दाखवूं शकेन, पण केवळ गुणवर्णन करणें म्हणजे अभिप्राय देणें नव्हे.

पहिल्या दोन्हीं पुष्पाप्रमाणें श्री. देवाचें हें तिसरे पुष्पहि मराठी काव्यसृष्टींत शोभून दिसेल व रसिक विद्वानांच्या प्रेमादरास पात्र होईल यांत शंका नाहीं.

श्री. देवाचें बरेचसें अप्रकाशित काव्य लवकर प्रकाशांत येवो हीच सदिच्छा!

° ° ° ° ° °

—४—

## श्री. देव—कवि व काव्य

श्री. भ. व्यं. देशमुख
एम्. ए., एलएल्. बी.
ॲडव्होकेट, उस्मानाबाद

मराठीचें माहेरघर असलेल्या मराठवाडयांत अद्यापिहि संतकवींची परंपरा अखंड चालूं आहे.

ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर रामदास, जनी जनार्दन हंसराज स्वामी श्री. संत भटजी बापू महाराज, यांनीं प्रस्थापित केलेल्या, या परंपरेचें मंगल वतन जतन करून ठेवण्याचें कार्य, आजहि श्री. दासगणुमहाराज, श्री. दे. ल. महाजन नांदेड, व श्री. देव (धाराशिव) इत्यादि निष्ठावंत कवि मोठ्या आस्थेनें करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

देवानें दिलेलें प्रतिभेचें देणें, आपल्या परिश्रमानें शतगुणित करून 'वक्तृत्व–वाग्विभव' संपादन करावयाचे, नाथांनीं घालून दिलेला "संत-चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावी," हा दंडक कडक रीतीनें पाळावयाचा,

सभ्यतेची लक्ष्मण रेषा कधींच ओलांडवयाची नाहीं, व जगांत आपल्या वाणीनें आणि लेखणीनें मांगल्याचें आणि मानवतेचें महत्व वाढवावयाचें हीच ती संत कवींची परंपरा.

श्री. श्री. रा. देव हे त्या परंपरेचे एक प्रमुख पाईक आहेत. लहानपणीं मोठ्या कष्टानें अभ्यास करून मॅट्रिकमध्यें संस्कृत व मराठी या विषयांत पहिला नंबर मिळवून ७५ रुपयाचे पारितोषिक मिळविणारें, व शिकवण्या करून, वार लावून कसावसा उच्च विद्यालयीन अभ्यासक्रम नोकरी करतां करतांच संपविणारें, तसेंच १९२० ते १९५३ पर्यंत प्रपंचाचा भार उचलण्यासाठीं अत्यंत अन्याय्य, अशा राजवटीत, शिक्षकांची नोकरी करणारें, श्री श्री. रा. देव आज मात्र प्रतिज्ञापूर्तीच्या आनंदांत, समाधानानें काव्यशास्त्र विनोदांत, आपल्या आयुष्यांचा वानप्रस्थ उपभोगीत आहेत.

धाराशिव नगरींत पवित्र भोगावती तीरावर १०० फूट उंचीच्या टेकडीवर, आपल्या आयुष्यांतील, तुटपुंज्या कमाईवर, मागे टाकलेल्या पैशांतून बांधलेल्या लहानशा दुमजली छोटेखानी बंगलींत (इंदिरा देव निवास ) बसून, कधीं उन्मन होऊन देव भक्तीचीं गाणीं गात आहेत. कधीं समोरील नदीचे लहानसें पात्र, त्या कांठचा मळा, त्यांतील आम्रवृक्षांवर पडलेली संध्याकाळच्या कोवळ्या किरणांची सोनेरी प्रभा व बागेंतील इतर रम्य दृश्यें, रसिकतेनें पाहाण्यांत गुंग होऊन गेले आहेत. तर कधीं श्री. भटजी बापूंसारख्या संतांचें चरित्र कथन करण्यांत तल्लीन झाले आहेत, कधीं, ज्या महाभागांनी निजामी राजवटीचा व ब्रिटिश साम्राज्य शाहीचा अंत करण्याचा प्रतिज्ञा करून, त्यांची पूर्ति केली. त्या सर्व महाभागांच्या मनीषांना, त्यांच्या कष्टांना आप्तेष्टांना,व त्यांच्या प्रतिज्ञापूर्तिच्या आनंदाला अक्षररुप देत आहे, हें पाहून, त्यांचा एक लहान मित्र व चाहता, या नात्यानें मला अत्यंत आनंद होत आहे.

'प्रतिज्ञापूर्ति' हें एक खंडकाव्य आहे. "देवकन्या" हा स्फुट कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर, देव प्रतिभेनें प्रदीर्घ चरित्र रचनेकडे ( श्री. संत भटजीबापू महाराज यांचे चरित्र ) झेंप घेणें स्वाभाविक होते. तथापि ते कार्य 'प्रतिज्ञापूर्तीच्या' मानानें फार सोपें होतें. त्यांत एका प्रत्यक्ष

हाडामांसाच्या व्यक्तीचें चरित्र चित्रण करावयाचें होते, पण ' प्रतिज्ञापूर्तिचा ' या खंडकाव्यांत कवीला काल्पनिक पात्रें निर्माण करावीं लागलीं आहेत. चंद्र आणि चंद्रिका हीं पात्रें म्हणजे विशिष्ट पाहिलेली अशी कोणतीच हाडामांसाची सजीव पात्रे नसून, कवीनें पारतंत्र्य काळांतील प्रत्येक स्त्री-पुरुषांच्या अंत:करणांत असलेल्या देशभक्तीच्या ऊर्मीला व स्वातंत्र्य प्रेमाच्या भावनेला मूर्त रुप देऊन निर्माण केलीं आहेत, हें या गोड काव्याचें वैशिष्टय आहे.

यांतील पात्रें ही जिवंत पात्रें नसून, अमूर्त निराकार, भावना मूर्तरुपांत येऊन, आकार धारण करून हालचाल करीत आहेत, असा भास हें काव्य वाचतांना—रसिकाला झाल्याशिवाय रहात नाहीं. चित्रपट सृष्टींत कधीं कधीं भुतांच्या हालचाली दाखवितांना एक अस्पष्ट अंधुकपणा दाखविलेला असतो, तसाच कांहींसा प्रयोग श्री. देवांनीं या काव्यांत करून दाखविला आहे, असे मला वाटतें व यांतच या काव्याच्या गुणदोषांचा उगम झाला आहे.

कथानकाची चमत्कृतिपूर्ण गुंफण किंवा पात्रांची सजीवतेचा भास निर्माण करणारी मोहक हालचाल वा वर्णनें, इत्यादि गोष्टी या खंडकाव्यांत दिसून न आल्या तरी रसिकांना उदात्त विचारांच्या उच्च वातावरणांत नेऊन सोडण्याचें सामर्थ्य, या देवांच्या काव्यांत निश्चित आहे.

कलेच्या निर्जीव तंत्रापेक्षां जिव्हाळयाचा जिवंत मंत्र, हाच ललित वाङमयांचा खरा निकष असतो, व म्हणूनच हें काव्य श्री.लोकनायक बापूजी अणे, डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या सारख्या विद्वान रसिकांना अत्यंत आवडलें, इतरांनाहि आवडेल यांत शंका नाहीं

या दृष्टीनें तुलना करावयाची झाल्यास साने गुरुजींच्या 'आस्तिक' कादंबरींशी या काव्याची करतां येईल या दोन्हींही कृतींत देशभक्ति स्वातंत्र्य प्रेम, कर्तव्य निष्ठा, सेवापरायणता, त्याग, संयम इत्यादि सर्व सद्‌गुणांचा मधुर सुगंध सर्वत्र दरवळत राहिलेला प्रत्ययास येतो. व कवीच्या मनाचा कल, कलेपेक्षां जीवनाकडे व साधुत्वाकडेच अधिक आहे. ही गोष्ट स्पष्ट रीतीनें दृष्टीस पडते.

श्री. देव यांची भाषा फार प्रासादिक, सुबोध आणि ओघवती असून मधून मधून त्यांनीं केलेलीं वर्णनें खरोखरच मोठीं सुंदर व वीररसपूर्ण आहेत.

तसेंच कवीची प्रतिभा सर्वस्पर्शी असल्यामूळें कधीं, हिमानें गारठलेल्या, भुकेनें व्याकूळ झालेल्या, वस्त्रहीन, पददलित जनतेचें अत्यंत हृदयस्पर्शी करुणचित्र रेखाटतें, तर कधीं संसाराचें मर्म व्यक्त करणारी प्रणयी जनांची निःशब्द कुजबुज व्यक्त करून दाखविते.

सारांश, या काव्यांत देशभक्तीच्या घरीं करुण, वीर, शृंगार इत्यादि रसहि पाहूणें म्हणून आले आहेत व पंक्तिकर झाले आहेत. असें हें सुन्दर खंडकाव्य लिहून श्री. देवानीं रसिकांच्या मनांत स्वतः विषयी फार मोठया आकांक्षा निर्माण केल्या आहेत.

अेक अभिजात शिक्षक, सुप्रसिद्ध कीर्तनकार व नामांकित कवि, अशा तिहेरी परंपरांनीं देवांच्या जीवनाचें महावस्त्र विणलें गेलें आहे.
परमेश्वराच्या कृपा प्रसादानें--

"देवांच्या कन्या" वरचेवर रुपगुणसंपन्न होऊन अधिकाधिक रसिक जन मनोरंजन करीत, अशी प्रार्थना करुन देवांचा हा गोड परिचय तूर्त संपवितो.

# प्रस्तावना

## ले. श्री. लोकनायक माधव श्रीहरी अणे

( माजी राज्यपाल बिहार )

मराठवाड्यांतील धाराशिव (उस्मानाबाद) येथील प्रसिद्ध कवी श्री. श्री. रा. देव यांचें ' प्रतिज्ञापूर्ति ' हें खंडकाव्य, (देवकन्या ग्रंथमालेंतील) ३ रें पुष्प आहे. काव्य, वाचून फार आनंद झाला.

यांच्या इतर दोन पुष्पांवर देवभक्तीचा सात्विक पांढरा रंग खुलून दिसतो, पण या तिसऱ्या पुष्पास देशभक्तीच्या रजोगुणात्मक लाल रंगामुळें कांहीं निराळीच शोभा आली आहे.

श्री. देद यांची काव्यशक्ति, ज्या प्रेमानें व सहृदयतेनें, भक्तीचें व वत्सलतेचें वर्णन करूं शकतें, त्याच प्रेमानें व उत्साहानें ती देश-भक्तांच्या साहसी व त्यागी पराक्रमाचेंहि सुंदर वर्णन करूं शकते, हें त्यांच्या प्रतिज्ञापूर्ति (पुष्प ३ रें) या वरून स्पष्ट होतें.

या पांच सर्गात्मक खंडकाव्याचें कथानक ऐतिहासिक किंवा पौराणिक नसून काल्पनिक आहे.

**कथानक आकर्षक असून त्यांत पकड व सूत्रबद्धता आहे.**

दोन प्रणयी जनांच्या प्रतिज्ञापूर्तींची यांत हकीकत आहे. कथेंतील नायक चंद्र हा एका निःसीम देशभक्ताचा पुत्र व नायिका, चंद्रिका तपो-वनांतील एका कुटीरांत रहाणाऱ्या साधूचीं कन्या.

देशक्तीमुळें, त्या देशभक्ताचा, भारतावर राज्य करणाऱ्या परकीय असुरांनीं अतोनात छळ केला. तो ताप दुसह झाल्यामुळें त्या देशभक्तानें आपल्या एकुलत्या मुलास (चंद्रास) एका साधूच्या चरणीं अर्पण करून तो अज्ञात स्थळीं निघून गेला.

साधूनें आपल्या आश्रमांत, चंद्रिकेंचे लग्न चंद्राबरोबर लावलें, व ती कन्या चंद्रास अर्पण करते वेळीं चंद्राच्या वडिलांची उत्कट इच्छा व्यक्त केली कांहीं दिवसांनीं तो साधू मरण पावला ती इच्छा अशी :—

" आजपासुनी पुत्र दिला मी देशासाठीं दान
तारुण्यीं हा येइल तेव्हां, निरोप माझा सांग
'स्वातंत्रता ' हें ध्येय असावें, तदर्थ जीवित त्याग.'

पित्याची ही इच्छा पूर्ण करण्याची प्रतिज्ञा चंद्रानें केली, व चंद्रिकेचें पाणिग्रहण त्यानें गुरुच्या आग्रहामुळें केलें, पण गृहस्थाश्रमी बनला नाहीं.

चंद्रानें भीष्माप्रमाणें गंभीर प्रतिज्ञा केली कीं--

"जोंवरि देश स्वतंत्र ना, हो, मिटे न, अत्याचार
तोंवरि राही संयमीच मी, ब्रह्मचारि निर्धार "

त्या नंतर चंद्रानें, देशातील परकीय असुराचें आक्रमण व अत्याचार यांचा प्रतिकार करण्यासाठीं, कांहींतरी पराक्रम करावा, या उद्देशानें, तपोवन सोडून दूर जाण्याचें ठरविलें. आपला उद्देश त्यांनी चंद्रिकेस सांगितला तो अत्यंत ओजस्वी आहे.

या प्रसंगी श्री. देवांची वाणी कसा ओज प्रकट करितें तें पहा.

" मानवता ही सदा रहावी जिवंत लोकीं म्हणुनी
ईश्वर-कर, हें खल नाशया उठतिल रानोरानीं
अस्थिचर्ममय हिंद भूमिचें, उरलें, बल, जें, शेष-
संचय करूनी अजात रिपु करूं, प्रेमळ अमुचा देश
रणभेरींचा घुमेल आतां खल नाशार्थ निनाद

० ० ० ०

शीघ्र चंद्रिके ! ऐकशील तूं " विजय विजय, हा, साद "

चंद्रिका प्रथम त्याच्या जाण्यास विरोध करतें, पण मागाहून तीहि त्याच्या बरोबर पुरूषवेषानें जाण्यास तयार होतें. चंद्र चंद्रिकेंमधील संवाद, तपोवनाचा निरोप घेण्याचा प्रसंग श्री. देवांनी अत्यंत मार्मिक भाषेंत वर्णन केला आहे.

शाकुंतलातील कण्वाश्रमाचा निरोप घेतांना शकुंतलेच्या मनाची जी दुस्थिति झाली, तिचेंच प्रतिबिंब, देवांनीं, केलेल्या वर्णनांत दिसतें व येथें देवांची प्रतिभा उमटून दिसतें

जग कपटी व स्वार्थी लोकांनीं घेरलेलें आहे असें साधूलोक सांगतात. या कपटीं जगांत जाण्यापेक्षां, पशुपक्ष्यांचा हा प्रेमळ एकांतच बरा,

याचें वर्णन कवि करतो.

" नाथा ! तुमची आज्ञा म्हणुनी करितें प्रस्थान
स्थान रम्य हें, इतर या पुढें गमते निरयस्थान"

० ० ० ० ०

चंद्रिकेचे हे उद्‌गार ऐकतांच, चंद्रानें तिला दिलेलें उत्तर, फार गंभीर, ओजस्वी व उदात्त विचारांनीं भरलेलें आहे. पहा--

" संसारीं या राहुनि जो का, मोहपाशि ना फसला
साधु खरा तो असे संयमी, कर्तव्यीं ना ढळला
जनसेवा ही परमेशाची सेवा खरी गणावी
वनीं राहुनी असली सेवा, कैशी सांग घडावी "

येथें कवि कुलगुरु कालिदासाच्या....

" विकार हेतौ सति विक्रियंते
येषां न चेतांसि त एव धीरा :

या उद्‌गाराचा, पहिल्या दोन पंक्तित श्री. देवांनी, जो अनुवाद केला आहे तो फारच योग्य वाटतो.

याप्रमाणें दोघेहि प्रवासास निघाले, रात्रभर चालून दिवसा ते एका नदीच्या कांठीं आले,

त्यांना तेथें एक नाव दृष्टीस पडली तिच्यात ते दोघेही बसले. व न व वल्हवीत ते त्या नदीच्या धारेवर आले. तोंच एक मोठें बादळ आले. नाव डगमगूं लागली व ती दोघांना घेऊन केव्हां जलसमाधि घेईल याचा नेम नव्हता. नौकेंत पाणी शिरलें. दोघेहि प्रणयी वीर अर्धजलमग्न उभे राहिले

पण अशाहि संकट स्थितींत, ते भयभीत न होतां मोठचा शांतीनें व धैर्यानें प्रसगाला तांड देत होतें.

त्यांना खेद होता तो याचा कीं

" प्राण चालला मुळीं न याचा खेद वाटतो मजला
जन्म घेइ तो जाय एकदां स्वर्गीं टाकनि तनुला

खेद परी कीं, जगीं प्रतिज्ञापूर्ति न झाली अजुनी
तोंच हरावी काळानें कां ज्योत आमुच्या तनुची ''

० ० ० ०

शेंवटी दोघांनी अेकमेकांची शेवटची भेट घेतली. पुढें वादळ शांत झालें. दिशा प्रसन्न झाल्या. सूर्याचा स्वच्छ प्रकाश पडला. नदीचा प्रवाह संथ पणें वाहूं लागला. पण त्यांत हे दोघे प्रणयी वीर युगुल मात्र कोठें दिसत नव्हतें, व त्या नावेचाहि कोठे पत्ता नव्हता.

" पुनश्च झालें वारि नदीचें सुगम जाहला पंथ
नाव परी ना दिसली कोठें वारि जरी हो शांत ''

येथें पहिल्या सर्गाचा कथाभाग संपला.

० ० ० ० ० ० ०

दुसऱ्या सर्गांत चंद्रिकेचा वहात आलेला देह अेका तपस्व्याच्या दृष्टीस पडला. त्यानें तिला आश्रमांत नेलें. ती शुद्धीवर आली. तिनें तपस्व्यास विचारलें

" प्राणसखा मम कोठें आहे, सांगा कृपा करोनी "

त्यावर मुनि म्हणाले–

" शोध काढितो, तुझ्या पतीचा शीघ्र कन्यके! खास" असे आश्वासन दिले, पण तिला बजावून सांगितलें कीं " येथुनि बाले ! मुळीं न हलणें, जों, न येई, मी, परत,

पण चंद्रिका मात्र मुनि जातांच, आश्रम सोडून जिकडे वाट दिसेल तिकडे निघून गेली.

श्री. देवांनीं, तिच्या विरह स्थितीचें वर्णन प्राचीन संप्रदायास अनुसरून केले आहे, त्यांत नवकल्पना नसली तरी कवीची वाणी ओघवती असल्यामुळें त्यांत आकर्षकत्व आलें आहे.

या विरहाच्या व्यथेंतच तिला अेक समाधानाचा व जीवित– साफल्याचा मार्ग सुचला.

विरहामुळें जीवनाला कंटाळून जीविताचा अंत करण्यापेक्षां, पतीच्या

सदिच्छेची पूर्ति करण्याकरितां झटणें हाच तो उत्तम मार्ग, असा विचार तिच्या मनांत आला, व ती म्हणाली—

“ मनांत होता देशभक्तिचा, पतिच्या, अतीव पूर
तीच करोनीं मी जगवावी, माझी सुंदर नूर
इच्छा पतिची सफल करावी धर्म हाच भार्येचा
स्वदेशसेवा करोनी राखिन, धर्म मीच आर्याचा
ज्या योगानें निजदेशाची सेवा घडेल हातें
ते, तें आतां करीन निशिदिनिं, तन मन अर्पिन याते ”

० ० ० ० ० ० ०

हीच दिव्य प्रतिज्ञा चंद्रिकेनें केली.

या प्रतिज्ञेनें चंद्रिका किती ओजस्वी, व विकारापेक्षां विचार प्रवर्तक होती हें स्पष्ट होतें. कवीनें या आपल्या नायिकेचें धीरोदत्त विचाराचें वर्णन करून खूपच बहार केली आहे.

विकाराला मूठमाती देऊन तरुणी चंद्रिका अत्यंत विचारशील होतें. व शेवटपर्यंत आपलें ध्येय गांठतें, यापेक्षां तिनें आणखी कोणतें कर्तृत्व दाखवावयाचें शिल्लक ठेवलें होतें ? तिनें रणांगणावर लढून आपल्या शौर्याची व कर्तृत्वाची सीमा गांठली होती.

० ० ० ० ०

तिसऱ्या सर्गांत मुनीला नदीवर एका युवकाचें प्रेत वहात आलेलें दिसलें.

त्यांनीं, ते जवळ घेतलें व बराच प्रयत्न केल्यावर तें प्रेत नसून त्यांत प्राण आहे, अशी मुनिची खात्री झाली. त्यांनीं, त्यास आपल्या पर्णकुटींत आणून धूनिसन्निध कुशासनावर ठेविलें. त्याच वेळीं पूर्वी आश्रमांत आलेली कन्यका निघून गेली हे मुनीच्या लक्षांत आलें.

थोडया वेळानें त्या तरुणाची मूर्छा गेली, त्या बरोबर त्याला आपल्या तरुण पत्नीची आठवण झाली, पण मुनीनें तिच्याबद्दल त्यास कांहींच वार्ता सांगितली नाहीं.

मुनीचा व त्या तरुणाचा या सर्गांतील संवाद, उदात्त विचारांनीं

भरलेला, वाचकांनीं वारंवार वाचण्यासारखा आहे.

मुनीनें, त्या तरुणांनीं स्वकर्तव्यरत व्हावें, म्हणून जें सांगितलें तें देवांनीं खालील ओळींत कसें रंगविलें तें पहा.

" विघ्नें येतां चित्त चळेना, धीर धरावा खचित
' तिमिरानंतर प्रकाश येतो,' असें बोलती संत
तोंड संकटा देतो तो नर, कार्य घडे तत् हातें
साहसाविण कां कुणी पावतो, कांचन–ऐश्वर्या तें ?

० ० ० ० ०

यावरील, मुनीच्या मुखांत घातलेलें वीरोत्साहपर वर्णन वाचून कोणाला स्फुरण चढणार नाहीं ? वीररसाचें उत्कृष्ट शब्दचित्र यापेक्षां दुसरें कोणतें असूं शकेल ?

मुनीचें भाषण संपल्यावर तरुण म्हणालाः--

" शुभवेला ही गुरो ! सोडितो पर्णकुटीचा वास "

असें म्हणून देशहितार्थ तो तरुण (चंद्र) साहस करावयास पर्णकुटीच्या बाहेर पडला.

चंद्रिकेचा किंवा प्रणयाचा कोणताहि विचार त्याच्या मनांत आला नाहीं. केवढा संयमी नायक ! केवढा हा त्याग ! कर्तृत्वाची किती परि-सीमा ! त्या प्रसंगीं मुनीनें त्यास आशीर्वाद दिला

" मंगलमय हो, पथ तुझा बा ! लाभो तुज यश कीर्ति
तुझी प्रतिज्ञापूर्ती होईल, फुटो अमंगल मूर्ति

० ० ० ० ०

चौथ्या सर्गांत चंद्र व चंद्रिका, लोकमत जागृत करून. लोकांना असुरांचा प्रतिकार करण्यास उद्युक्त करतात. याचें कवीनें 'वक्तृत्व कसें असावें?' हें दाखवून, अत्यंत रसभरित वीररसपर वर्णन आपल्या काव्यांत ओजस्वीपणें केलें आहे.

श्री. देवांनीं याचा सुंदर अनुवाद येथें केला आहे. देशांतील जनता व सत्ताधीश यामध्यें संघर्ष निर्माण होऊन युद्ध जुपलें, त्या युद्धांत चंद्र व चंद्रिका, यांच्या अल्प, पण तळहातावर शिर ठेवण्यास तयार केलेल्या सेनेनें,

दा. क्र. ९२९१

मोठा पराक्रम करून परकीय सत्तेला कसें खडे चारले हें दाखविलें आहे.

या युद्धांत, मुलांस साधूच्या स्वाधीन करून, परागंदा झालेला; त्या तरुणाचा पिता दाढी वाढवून गुप्त स्थितींत राहिलेला, प्रसंग साधून तेथें आला व आपल्या मुलावर पडणारा तलवारीचा घाव, त्यानें एकदम मध्यें पडून आपली प्राणाहुति तेथें दिली, हा विलक्षण योगायोग आहे यांत संशय नाहीं. यांत नवल वाटण्यासारखें कांहींच नाहीं.

चंद्राच्या वडिलानी प्राण सोडण्यापूर्वी आपण कोण याची ओळख करून दिली, व आतां देश स्वतंत्र झाला आहे, तुम्ही उभयतां पाणिग्रहण करावें, व देश सुखी करावा असा आपला मनोदय सांगून अेकमेकांची हातमिळवणी केली व मर्त्य जगाचा निरोप घेतला. हा प्रसंग वाचतांना कोणाचेंहि हृदय भरून येईल, इतकें सुंदर व हृदयस्पर्शी वर्णन केलें आहे.

मुनीच्या, या कळवळ्याच्या शब्दांनीच, या सुंदर काव्याचें कथानक संपलें आहे. कसें तें पहा.

“ सत्शीलाची खाण अशी ही भार्या तुजला लाभे
पाणिग्रहणा अतां करावे, चंद्र चंद्रिका शोभे
पिता तुझा मी सत्पुत्रा ! बा ! ओळख तुला पटेना
बालयीं असतां विलग जाहलो माझ्या पंचप्राणा !
सुखें, चंद्रिके सवें करावा, देश सुखी हा चंद्रा !
येतो आता निरोप द्यावा, घेतो अंतिम निद्रा
प्राण जाहले गोळा माझे, शब्द न आतां निघती
देशोद्धरणीं तत्पर जे कां, त्यांना माझी प्रणती
देवा प्रिय तें वीर जगीं जे करिती जनहित सेवा
“ रणा वांचुनी स्वातंत्र्याचा मिळे न कोणा मेवा”
जयजयकारें करा गर्जना भारत देशाची
बोलुनि अैसें, देह ठेविला, धन्य असे मुनिची.”

० ० ०

परंतु कवीनें कथापूर्तिस्तव (१०-१५) ओळीचा ५ वा सर्ग लिहून, चंद्र चंद्रिकेला त्यांच्या प्रिय पर्णकुटीत पोंचवून, त्या दोघांनीही प्रतिज्ञापूर्ति झाल्यावरच समाधानानें अेकामेकांवर प्रेम दृष्टिक्षेप केला व ते सुखानें

गृहस्थाश्रमाचें सुख भोगू लागलें, याचें दिग्दर्शन करून काव्य आनंद-पर्यवसायी केलें आहे व शेवटीं—

" देशास्तव जे प्राण अर्पित, विस्मृती हो, ना, त्यांची
'देव' घालतो प्रेम भरे, त्या माला सुमनाची "

सहजसाध्य आपल्या नामोच्चारानें व सदिच्छेनें श्री. देवांनीं आपलें हें सुंदर व अत्यंत हृदयस्पर्शी काव्य महाशिवरात्रींच्या मंगल दिनी पूर्ण करून, आपली हीं प्रतिज्ञापूर्ति केली आहे.

हें कथानक अल्प असलें, तरी तें रम्य व उच्च बिचारांनीं व उदात्त भावनांनीं भरलेलें आहे. सृष्टिसौन्दर्यावरील वर्णनें, सरस उतरली असून त्यांत कल्पनाविलास, व स्वभाव परिपोष चांगला वठला आहे. या काव्यांत देशभक्तांच्या भावनाचे सुंदर आविष्करण श्री देवांनीं केलें आहे.

रसिक वाचकांस हें काव्य आवडेल असा मला पूर्ण विश्वास वाटतो यांच्या कार्यास मी सुयश चिंतितो.

श्री. देवांच्या लेखणींतून अशींच उत्कृष्ट काव्यपुष्पें विकसित व्हावी, हीच परमेश्वराजवळ माझीं प्रार्थना आहे

३९।१, सिव्हिल
लाइन्स, नागपूर

*माधव श्रीहरी अणे (नागपूर)*

# लेखकाचें मनोगत

स्वातंत्र्याची पहाट उजाडेपर्यंत विवाहबद्ध न होण्याची प्रतिज्ञा भारतांतील अेक तरुण (चंद्र) व तरुणी (चंद्रिका) करतात. त्यांच्या धैर्यानें व अलोट साहसानें देश स्वतंत्र होतो, व त्यांनीं केलेल्या प्रतिज्ञेची पूर्ति होते; म्हणूनच या खंडकाव्यास 'प्रतिज्ञापूर्ति' हें नांव दिलें आहे.

'देवकन्ये'चें हे तिसरें पुष्प रसिक वाचकांच्या हातीं देण्यास जगन्नियंत्यानें व संतश्रेष्ठ कवींनीं प्रेरणा दिली, त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

देवकन्या (पुष्प १ लें,) श्री. संत भटजी बापू (पुष्प २ रें) यांवर विद्वान रसिक, श्री. डॉ. शं. दा. पेंडसे, नागपूर, श्री. लोकनायक मा. श्री. अणे, (प्रकृतिस्वास्थ्य नसतांहि ) प्रा. सोनोपंत दांडेकर, प्रसाद, पुणें. श्री. वा. दा. गोखले, चिटणीस म. सा. परिषद पुणें, संपादक विवेक मुंबई व औरंगाबाद श्री. के. गोळेगावकर, ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर पंढरपूर, प्रा. देऊळगांवकर गुलबर्गा, संपादक 'सकाळ' या सर्वांनी, माझ्या दोन्ही काव्यसंग्रहास, अभिप्राय सुमनांनी मंडित केलें, त्या सर्वांचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणें, वेळांत वेळ काढून, अत्यंत कामाची निकड असूनहि, ज्यांनी माझ्या 'प्रतिज्ञापूर्ति' या खंडकाव्याचे मार्गदर्शन केलें; असें महाराष्ट्रांतील प्रसिद्ध राजकवि यशवंत, पुणें, याचें आभार मानणें अनुचित होणार नाहीं, नायक व नायिका यांच्या साहसाबद्दल व कर्तृत्वाविषयी जरी त्यांचा कांहींसा मतभेद असला व त्यांच्या कर्तृत्वाबद्दल, त्यांची जास्त अपेक्षा असली, तरी देश स्वतंत्र करणें, हें दोघांचें ध्येयच, त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देण्यास पुरेसें आहे असें कवीस, त्याचप्रमाणें प्रस्तावना लेखक श्री. लोकनायक अणे, यांच्या मतावरून वाटतें... मतें भिन्न असूं शकतात.

कविवर्य यशवंत यांनी आपलें प्रांजल मत देऊन योग्य अशी वाट (प्रतिज्ञापूर्तिच्या वाटेंत) या शीर्षकांत दाखवून, जे मार्गदर्शन केलें, याबद्दल मी पुनः त्यांचे आभार मानतो.

तसेंच सुप्रसिद्ध साहित्यिक व प्रसिद्ध लेखक माझे मित्र श्री. अ. ज्ञा. कुलकर्णी एम. ए. बी. टी. यांनी या काव्यावर सुंदर व समर्थक परीक्षणा-

त्मक अभिप्राय दिला त्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. माझे देवकन्या पुष्प १ लें, यांचे प्रस्तावना लेखक माझे मित्र, मराठवाड्यांतील सुप्रसिद्ध, साहित्यिक लेखक व शिक्षण खात्याचे डे. डायरेक्टर (औरंगाबाद) श्री. मुरलीधरराव घाणेकर यांनी वेळांत वेळ काढून या माझ्या 'प्रतिज्ञापूर्तिच्या' तिसऱ्या काव्यपुष्पास अभिप्राय लिहून, जे गुणदोषात्मक परीक्षण केलें. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणें उस्मानाबाद येथील प्रसिद्ध साहित्यिक समीक्षक, वक्ते व उस्मानाबाद येथें झालेल्या, साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष, (ज्यांच्या प्रेमामुळें माझा दुसरा काव्यसंग्रह श्री. संत भटजी बापू याचा, कवि यशवंत यांचें हस्ते, प्रकाशनाचा योग आला) श्री. भगवानव्यंकटेश देशमुख, एम्.ए. एल.एल बी. वकील यांनीं आत्मीयतेनें व शुद्ध अंतःकरणानें माझा व माझ्या काव्याचा, जो अल्प पण योग्य परिचय करून दिला, त्याबद्दल त्यांची कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्यकर्म ठरतें,

विशेष उलेखनीय म्हणजे मराठवाड्यांतील प्रमुख म्हणविणारे मासिक 'प्रतिष्ठान' याच्या संचालकांनीं रमाकांत या टोपण नांवाखालीं, आत्मीयतेनें 'माहेरचा आहेर' या सदराखालीं 'देवकन्येचा' सत्कार करून, जे सुंदर वस्त्रालंकार घातले, त्याबद्दल तिच्या पित्यानें, आभार मानण्याचें कांहींच कारण नाहीं. कन्येला केलेला माहेरचा आहेर कसाहि असला तरी तो सत्प्रेमाचा द्योतक होय !

आतां हा सत्कार, व बाहेरून झालेला सत्कार, याचें मूल्यमापन, मी न करितां, हें काम रसिक वाचकांकडेच सोपविणें बरें, असें मला वाटतें.

सर्वांत अवघड व अत्यंत महत्वाचें काम म्हणजे प्रस्तावना लिहिण्याचें.

ज्यांनी आढेवेढे न घेतां (पक्षघातानें आजारी असताहि) प्रथम दर्शनींच माझ्या काव्यसंग्रहावर, योग्य शब्दांत, प्रेमळ भावनेनें अभिप्राय दिलें, व परमेश्वराजवळ माझें सुयश चिंतिलें, त्या विव्दान रसिक महाभाग लोकनायक बापूजी अणे. यांनींच 'प्रतिज्ञा पूर्ति' या तिसऱ्या खंडकाव्यावर जवळ जवळ ८ पानें, पूर्ण काव्य वाचून व निरीक्षून आत्मीयतेनें योग्य प्रस्तावना लिहिली. दुसऱ्याचें अल्पगुण देखील मेरुपर्वताप्रमाणें आहेत अशी

विचारसरणी ठेवून, त्याचप्रमाणें लिहिणें, यालाच थोर म्हणतात. काव्य परीक्षण करणाऱ्यांच्या अंगी कांहीं विशिष्ट गुण, पात्रता, सडेतोडपणा विद्वत्ता व रसिकत्वादि गुण लागतात. श्री. अणे डॉ. पेंडसे, अशा थोर व्यक्तींच्या लेखणींतून निःस्पृहपणें–सत्य तेवढेंच बाहेर येतें असो.

श्री. पेंडसे, लोकनायक बापूजी अणे यांच्या या सत्प्रेमाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

मुखपृष्ठावरील, प्रसंगोचित, सुंदर चित्र काढून, मुखपृष्ठाची उत्तम सजावट केली, त्यांबद्दल प्रसिद्ध अेम. अेस, आर्टस् सर्व्हिसेस, पुणें यांचा मी आभारी आहे.

प्रसिद्ध ब्लॉक मेकर श्री. के. जोशी, पुणें, यांनी सुंदर ब्लॉक तयार करून दिले. त्याचप्रमाणें श्री. व. वि. आपटे, हिंदुस्थान मुद्रणालय, पुणें. यांनी योग्य खर्चांत उत्तम छपाई करून दिली त्याबद्दल त्या दोघांचे आभार मानणें लेखकांचें कर्तव्यच होय.

पहिल्या दोन काव्य पुस्तकांस रसिकांनी सक्रिय सहानुभूति दाखवून, जसें प्रेम व्यक्त केलें, तसेंच याही पुष्पास दाखवितील, अशीं आशा करून हें मनोगत येथेंच संपवितो.

देवनिवास ( धाराशिव )
महाशिवरात्र शके १८७८
२७ फेब्रुवारी १९५७

श्री. रा. देव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८२९७
शाळा (स्थळ प्रत)

"प्रतिज्ञापूर्ति खंडकाव्य, देवकन्या पुष्प ३ रें हें श्री. देवांचे काव्य मी संपूर्ण वाचले, तें मला अत्यंत आवडले. व रसिकांसहि आवडेल असा मला पूर्ण भरंवसा वाटतो."

डॉ. शं. दा. पेंडसे
नागपूर.

[library stamp]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम २१९२२ वि: ९११०५
क्रमांक ... ९३५०४ ... नों: दि: २५।६।६
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८३१७
ग्रंथ शाखा (स्थलमत)

# प्रतिज्ञापूर्ति

## सर्ग १ ला

( वृत्त--साकी )

शांत निशा ती शांत तपोवन शांत दिशा आकाश
शांत तारका लुकलुक करिती देती मंद प्रकाश
निद्रित होती सृष्टि चराचर, वाहे मंद समीर
जागृत होता दीप प्रकाशें केवळ अेक कुटीर

प्रणय प्रणयिनी भूषवीत त्या पर्णकुटीं राहोनी
कितीक रात्रीं सुखें काढिल्या निद्रेवांचुनि त्यांनीं
होतें निद्रित अवघें जग तें परि त्यांच्या नयनांना
निद्रेचा ना तिळभर होता कोठें ठाव ठिकाणा

शल्य कोणतें बोचत होतें उभयांना अज्ञात
होतें कंठित काळ कशाला ठावें ना विपिनांत
भीति ग्रस्ता हरिणी परि तीं स्कंधीं ठेवुनि हात
चंद्रमुखी ती चंद्र मुखावर टाकि अश्रुचा पात

साश्रुनयन ती विनवि चंद्रिका प्रणयसख्या चंदाते
प्राणनाथ मम परिसा विनती, मान्य करा तीतें
विजनिं विपिनि या टाकुनि मजला तुम्हीं न कोठें जावें
मी अबला, मज सहन न होतें, विरह दुःख तुज ठावें

दीन हीन मी सरल बालिका, अनुभव मजला नाहीं
कंठुं कसें हें जीवित सखया, तुझ्या वाचुनी पळही ?
कपोतिनी मी, देइ, न मजला, वियोग वधिका हातीं
या परि बरवें मला वाटतें, इथें वधावें आधीं

त्राणचि उरला मुळीं न हृदयीं अंगीं माझ्या नाथ
'प्रयाण' केवळ शब्द मुखीचें सहतिल ना हृदयांत
प्राण कुडीतच जोंवरि माझ्या जाइ, न घाली आग
प्राणनाथ ! तूं सोडुनि जातां, जातिल पंचप्राण

या प्रणयाच्या चंद्र मुखावर मृदुल कौमुदी हास्य
विलसत होतें या योगानें, उतास आलें सौख्य
चंद्र चंद्रिकाऽधरास चुंबी कंठिं घातला हात
गुलाब गाला स्पर्श करोनी वदे तेधवां नाथ

" प्राणेश्वरि " गे कशास चिंता मनीं वाहसी उगिच
सोड भीतितें, परत येइ मी, थोड्याशा अवधींत.
नष्ट जाहला ज्या योगानें अमुला विभव विलास
गृहा टाकुनी स्वीकृत केला उभयांनी वनवास

ज्याच्या करितां घडती अगणित गृहास ही उपवास
तरिहि लागतो सहन करावा ज्याचा कटु उपहास
सुवर्णभूमि ! हाय ! तिच्या परि मुखीं मृत्तिका साज
हाय ! तुडविला कसा खलांनीं देव समर्पित ताज

नीति देवता पळूनि गेली धाकें यांच्या आज
हाय ! परंतु अजुनि न झाला अत्याचार समाप्त
रोमरोमिं हो शिरलें ज्यांच्या कुटिल नीतिचें बीज
आकाशांतिल विहंग वदती जळोजळो हें बीज

कालसर्प हें भूमीवरती फूं फू करिती अंध
गरुड प्रकटो जागोजागी करो तयातें अंध
दुर्गम ऐशा महासागरीं खळबळ होता सारी
अभिमानाची राहिल कैसी तृणांकुराची स्वारी

लाज वाटतें तया स्वतःची जाणिव नीचपणाची
तयास आहे ठाऊक निश्चित हार होय अमुची
मानवता ही सदा रहावी जिवंत लोकीं म्हणुनी
ईश्वरकर हें खल नाशाया उठतिल रानोरानीं

अस्थिचर्ममय हिंद भूमिचें उरलें बल जें शेष -
　　संचय करूनी अजात रिपु करूं प्रेमळ अमुचा देश
रणभेरीचा घुमेल आतां खलनाशार्थ निनाद
　　शीघ्र चंद्रिके ! अैकशील तू ' विजय विजय ' हा साद

वियोग घडला जरी घडिभरी कुयोग ना तो खास
　　पतंग मी गे ! प्रेमरज्जुचा येइन परतुनि खास
पंकज मालासम चंद्राच्या मिठी मारिती कंठीं
　　दृष्टि-चकोरें पहा देखिलें चंद्र-वदन आकंठी

वदलि चंद्रिका प्रणय मंदिरा ! माझ्या पंचप्राणा
　　आवश्यक कां अगदीं धरणें हातीं विषम कृपाणा ?
चटणी भाकर प्रेमाची परि पीयूषाहुनि थोर
　　काक दृष्टि परि क्षुद्रपणाची गमतें विषम कट्यार
नयनकटाक्षें केवळ बघतां शत्रुकडे मिळुन
　　सहजी होइल नाश तयांचा मुळिं न लागतां क्षण
वचन अैकुनी गालीं उमटे हास्य तदा युवकाच्या
　　बोले रमणी सुलभास्त्रानें होय न नाश रिपूंचा
कुटिल कटाक्षें हतबल करणें मत्त करी जो त्याते
　　प्रमदांचें हें कर्म असें गे ! योग्य न ते पुरुषाते
खड्ग घेउनी करीं रहावें उभें संगरीं धीट
　　वीरकर्म हें, कुणी न याते फिरवुं शकेना परत

लज्जित झाली, गालि रक्तिमा खेळुं लागली तेव्हां
बोले पतिला मलाहि नेणें जाणें होई तेव्हां
चिरसंगिनि मी तुमची नाथा ! नेणें तुमच्या संगें
छाया तेथें वृक्ष जिथेंही काय सांगणें लागे ?
वेली सोडी फुलवेला कां ? प्रकृति तेथें पुरुष
भ्रमर सोडितो कमलिनीच्या प्रेमाचा कां पाश ?
कंठमणि मी बनले नाथा तुमच्या कंठांतील
कंठ कापिला तरी न सोडी बाहू थोर विशाल
वंचुनि मजला जाशी तरिही करीन विषपान
पान न घडतां अधराचें तव जातिल पंचप्राण

× × × ×

युवक बोलला जरी न पटतो माझा हा उपदेश
तरी चलावें संगें-पण घे पुरुषाचा गे ! वेष
भीती लज्जा टाकुनि सारी साहसि पुरुषासम हो
' सुकुमारी मी रमणी आहे ' ध्यास मना नच राहो
कां न जन्मल्या रमणीं जगतीं शूर वीर विख्यात ?
म्हणुनी मजला हिणवुनि म्हणतां ' पुरुष वेष घे त्वरित '
तारा पद्मिनी शूराग्रणि ती थोर झांशिची राणी
या नव्हत्या कां रमणी, ज्यांनीं, रिपुस पाजिलें पाणी ?
अर्थ असा ना मम म्हणण्यांचा ' पुरुषवेष घे ' याचा
भेद कळावा कुणा न लवकर म्हणुनि असे ही यांचा

क्षमा करावी कळलें नाहीं उगिच बोलले कांता !
कांता कधि कां वचन मोडिते प्रिय पतिचें कल्पांता

\+ + +

मस्तकिं फेटा भव्य विराजे सुंदर करांत खड्ग
नारीचा तो नरवर बनला शोभे सुंदर अंग
दर्पणि पाही निजमुख परि ना ओळख पटली तिजला
सोंग घेतलें संपादाणि ही पूर्ण जाहली सुलभा
सस्मित वदना द्रुतगतिनें ती पतिच्या सन्निध आली
तो न ओळखे नवल हेंच कीं पुरुषवेषही ल्याली
सोंग साधलें पूर्ण हुबेहुब वीर बने रमणी ती
चंचलता परि मृगनयनांची लोपुं शकेना भ्रांती

× × ×

मीनाक्षी तूं नयन तुझें हे आहे भेद निधान
दावितील ते चतुर जनातें तुझें नेमके स्थान
कशास आतां विलंब कांते ! दूर देशिं चल जाऊं
शेवटचें हें तपोवनाचें दर्शन आपण घेऊं

## निरोप

पशुपक्षांनो! जातो आम्हीं येथुनि आतां दूर
लोभ असावा या दोघावर लागे हो हुरहूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलगत ३३
अनुक्रम 29522 वि: ८१०५
क्रमांक 9308 नों: दि: २५।६।८५



ताडन शब्दें करें हि केव्हां केलें असेल आम्ही
क्षमा करावी पशुपक्ष्यांनो या सर्वांची तुम्ही
प्राणाहूनी प्रियकर आम्हां होतें हेंच कुटीर
सोडुनि तें ही जातो आतां आम्हीं किती कठोर ?
सिंचुनि पाणी वाढविले या लतातरुंना सतत
तेंच सोडूनी जाणें आलें अमुच्या दुर्भाग्यांत
कुणी कथावें भविष्य पुढचें, होइल केव्हां गांठ
सजलनयन हे मौन धरीती खळे न अश्रू-पाट
अेक वेळ ही डोळें भरुनी पाही शोभा वनिची
जगूं झगडुनी रिपुशस्त्रांशी तरिच भेट हो तुमची

× × × ×

वदे चंद्रिका प्राणाहूनि प्रिय हें लता वितान
' सोडुनि जाणें ' विचार येतां विकल होतसे प्राण
शांत सुखद कां याहुनि आहे सुखकर हा संसार
वन्य पशुहूनि प्रेमळ आहे कां हो जग हें फार ?
अनुभव मजला संसाराचा नाहीं या जगताचा
परिचय मजला फुलवेलीचा प्रेमळ संसाराचा

वदती साधू द्वेषकपटमय आहे हा संसार
ओढा तिकडे कसा कळेना तुमचा गमतो फार
कार्य जोवरी लोभ तोवरी दाविति कपटी लोक
' गरज सरो नी वैद्य मरो' ही स्वार्थि जनांची रीत

वरवरचें हें ताका पुरतें सारें 'रामायण' हो
कुणी न कुणाचा कामा येती प्रसंग येतां क्षणि हो
नाथा ! तुमची आज्ञा म्हणुनी करितें मी प्रस्थान
स्थान रम्य हें इतर यापुढें गमतें निरय समान

° ° ° ° °

प्रणयी वदला प्राण वल्लभे ! बोलुं नको हें बोल
संसारीं, ना अेकांतीही, मानवतेला मोल

° ° ° ° °

संसारी या राहुनि जो कां, मोह पाशिं ना फसला
साधु खरा तो असें संयमी कर्तव्यीं ना ढळला
जनसेवा ही, परमेशाची सेवा खरी गणावी
वनीं राहुनी असली सेवा कैशीं सांग घडावी ?
सुखीं करावें श्रमें जगासी झिजवुन अपुली काया
मानवतेचा हाच अर्थ कीं हरि ते याच भजाया
लता तरुंचा पशु पक्षांचा मोह सोड तूं आतां
वियोग यांचा मनीं न आणि मृगनयने ! गे ! चित्ता
बोलुनि अैसे चंद्र चंद्रिका सोडुनि गेलें स्थान
रडूं लागले लतावृक्षही खालीं घालुनि मान

° ° ° ° ° °

हळूंहळूं तें चालूं लागलें चंद्र चद्रिका दोघे
शरीर चाले, परी हृदय ही पडलें मागें मागे
अेक सारखें पुनः पुन्हां ते मागें बघती वळुनी
असा कंठिला मार्ग तयानीं दीर्घ श्वासें करूनी

\+ \+ \+

निशा संपली उषा चमकली नटुनि सुवर्णाऽभरणीं
प्रियेस घेउनि प्रियकर आला वाहे जेथें तटिनी
तटीं तरुंच्या बुंधालागी दिसें बांधली नौका
सोडुनि तिजला उभय बैसले ,तिळ न पावले शंका

चंद्र;चंद्रिका मध्यभागि त्या तरुणीच्याही आले
अथांग होतें वारी जेथें, वाऱ्यानें जें हाले
पवन भयंकर सुटला तेव्हां धुंद जाहल्या निशा
मेघ भराभरा जमूं लागले आकाशाच्या कक्षा

मेघगर्जना क्षणोक्षणीं हो तळपे भीतिरें वीज
घोर प्रभंजन सुटला जेव्हां पडे उन्मळे वृक्ष
पर्जन्याच्या धारा पडती मुसलसमान हि थोर
तरणीवरती त्या दोघावर करिती घोर प्रहार

डगडग जेव्हां करूं लागली तरणीवरची तारिका
मिळेल केव्हां जलीं समाधी अंत न दोघां देखा
उभे अर्धजलमग्न तरी ते दोन्ही प्रणयी वीर

मिळेल आम्हां जळीं समाधी ‘ अशक्य गाठूं तीर
पहा भुतें ही किती कोपलीं बोलें प्रणयी वीर
प्रिये ! भाग हें शरीर त्यजुनी जाणें क्षणभंगूर
‘ प्राण चालला ’ मुळीं न याचा खेद वाटतो मजला
जन्म घेई तो जाय अेकदां स्वर्गी टाकुनि तनुला
खेद परी कीं जगीं ‘ प्रतिज्ञापूर्ति ’ न झाली अमुची
तोंच हरावी काळानें कां ज्योत अमुच्या तनुची ?
जनसेवेच्या आशेचा ही सुटला आतां दोर
दुर्दैवानें डाव साधिला, सुटला आतां धीर
ये ! ये ! देऊं तोंड संकटा दोघ मिळोंनि जाऊं
शेवटची ही भेट आपुली येथें आपण घेऊं

० ० ० ० ०

सहचारिणि मी तुझी सदाची हांसुनि बोले बाला
कंठिं घालुं दे सख्या ! प्रियकरा बाहूंची ही माला
मुखाब्ज आतां तुझा बघूं दे चुंबन करुं दे त्याचें
दिसेल आतां पुनः न कधिंही कालत्रयिही साचें
शांति परी ना ढळली त्यांची झाले शोक विहीन
देहानें जरि भिन्न दोन तें झालें जळीं विलीन

० ० ० ० ० ० ०

निसर्ग उलटे, शांत जाहला पवन निःसरे मेघ
निरभ्र झालें नभ अेकाकी, प्रसन्न झाले लोक
शुद्ध तरणि हा दिसूं लागला नभः प्रांगणीं आतां
जग हें सारें हसूं लागलें मोदभरें चित्ता

किलबिल किलबिल शब्द होतसें पक्षांचा ही गोड
युगुल आमुचे गेले कोठें क्षणभर पडलें कोड

× × ×

पुनःश्च झालें वारि नदीचें सुगम जाहला पंथ
नांव परी ना दिसली कोठें वारि जरी हो शांत

# सर्ग २ रा

नीलाकाशीं तेजःपुंजहि अेक हिऱ्याचें कुसुम
टाकित होतें कटाक्ष अपुलें नभः प्रांगणांतून
तेजोमय तत् किरणाचा हो उरीं लागतां मार
क्षाण होउनी लपून बसला तरु कोटरिं अंधार
पूर्व क्षितिजा वरी शुभ्रसा दिसला रवि प्रकाश
करीत होता चराचराच्या निद्रेचा तो नाश
तरल तरंगित सरितां सरितीं प्रभा फांकली रवीची
सुमनें पडलीं जणूं वाटतें आंत सुवर्णाची

भव्य मूर्ति मुनि अेक तपोधन शांत वृति अतिधीर
भरीत होते आनंदानें त्या तटिनीचें नीर
वाहत आले सरित् प्रवाहीं नर शव ते कोणाचें
कुतूहलानें तपोधनानें जवळ घेतलें साचे

कळूनि चुकलें पुरुष वेषधर होतें नारी रत्न
दिव्य तेज तें पाहुनि त्याचें झाला मुनिवर दंग
त्वरें आणिलें पर्णकुटीला केला बहु उपचार
धुगधुगि आली बघतां मुनिला हर्ष जाहला फार

उठूनि बसली मृगनयना ती पुरुष वेषधारी
प्रणाम केला तिनें मुनीला नयनि डबडबे पाणी
वेड्यापरि ती करुं लागली कुणीं न दिसला प्रेमी
कशाला कुठुनि आले कोण असे हा स्वामी

० ० ० ० ०

प्राण सखा मम कोठें आहे सांगा कृपा करुनी
जलीं बुडालो होतो आम्हीं दोघे अेक मिळोनी
जीवन जगणें प्रियतम नसतां शक्य शक्य ना स्वामी
माझे अश्रू साक्ष देति की पतिविण स्त्री निकामी
नारी आहे पुरुष न कोणी पटली मुनिला खूण
आधी याचीं यांत मुनीनें शंका उरली तिळ न

० ० ० ०

मुनिवर बोले स्नेहें तिजला बाले ! हो न हताश
शोध काढितो तुझ्या पतीचा शीघ्र शीघ्र मी खास
परी येथुनी तुवा न हलणें जों न परत मी येई
निर्भय राही सुखें कन्यके ! भीति इथें तुज नाहीं
कन्या माझी तुला मानितो धरी न शंका तिळही
केसाला ही धक्का लागण शक्य तुझ्या बघ नाहीं

० ० ० ० ० ० ०

धन्य धन्य बा ! मुनिवर तुजला पवित्र हृदय किती हें
नीचांनो ! घ्या धडा तरी हा पाप जळो तुमचे
सुंदर नारी करांत फसतां विटंबने तें करितां
शौर्य आम्ही हें गाजविलें हो ! राजरोस म्हणतां

० ० ० ० ० ०

प्रसंग सहजी आठवला मज शिवाजी रायाचा
ताच सांगतां थोरपणाही कळेल संस्कृतिचा
कल्याणीची युवती यवनी धरुनि आणि सरदार
म्हणे नीच तो, छत्रपतीला योग्य तुम्हां ही नार
कुंदकळ्यापरि दंतपाक्ति हो चाफेकाळि नाक
गुलाब गालीं फुलला सुंदर चंद्र मुखी ही साच
प्रवाल तैस अधर बिंब हे लाल निमुळते हें
चंद्र मुखी ही बघतां लाजे बिंब हि आकाशीचे

सिंहकटीं ती बघतां येतिल गुहा सोडुनी सिंह
गर्वगलित ते होतिल बघतां सिंहकटि ही छान
मुसमुसलेली सुंदर युवती भेट तुम्हां मी आणी
बक्षिस द्यावी जहागीर मज, युवती अपुली राणी

० ० ० ० ०

संतापाने लाल जाहले छत्रपती महाराज
म्हणे सुळावर चढवा पापी सरदारहि आज
मग तो युवतीकडे बघोनी बोले सादर वचन
भगिनी निर्भय तूं माझी गे देइ तुला मी वचन
साडी चोळी चंद्रहार मग नेसवि तिजला प्रेमे
भगिनी माझी इला पोंचवा तिच्या माहेरी वेगें
कुठें संस्कृति महाराष्ट्राची कोठ परकीयांची
तुलना करितां अभिमानाने मान उंच अमुची

० ० ० ० ० ० ०

असो ! सांगुनी परहिततत्पर गेला मुनिवर तीरीं
जलाशयीं तों डुडकी तरुणा परी दिसेना स्वारी
कुठें दिसेना शव तरुणाचें मुनिवर झाला खिन्न
प्रवाह वाहे दिशेकडे त्या शोधूं लागला तरुण

० ० ० ०

इकडे तरुणी पर्णकुटी तिळ राहुं शकेना शांत
विरह पीडितां पतिविण तिजला हो न कशाची भ्रांत

पर्णकुटींते त्यजूनि तरुणी गेली काननिं वाट
पडे अडखळे उठे पुनः ती मुळी दिसेना वाट
प्रेम अंधळे परी करी तें डोळसांसही अंध
समान अपुल्या दुजास करणें साधूचा हा पंथ

प्रेमनशेनें पीडित होतीं चंचल नयनें जेव्हां
जागृति निद्रा सोडुनि जाती प्रणय प्रेमी तेव्हां
गंधावांचुनि कुसुम जसें कां चंद्र चंद्रिका विहीन
मनुष्य जीवित फिकेंच केवळ जर कां प्रेमविहीन
प्रेम स्वर्ग हा प्रेम स्वर्ण ही प्रेम अशंक अशोक
देवाचे प्रतिबिंब प्रेममय इथे न राहो शोक
पीडित होती हृदयें सारी पीडा होता हृदयीं
मृदू लागतें सुरी परी हो प्रेमाची संसारी
व्याकुल होतें प्राण न ज्याचें प्रणयाच्या आभासें
भाग्यहीन तो पाषाणचि हो जगतितलावर भासे

० ० ०

कृपापूर्ण ही असे जयावर मंगलमय विभुची
प्रेमें पीडित होतो जन तो शंका मुळीं न याची

प्रेम निशेच्या आनंदाचा स्वाद घेतला त्याची
स्पर्धा सौख्यीं कुणी करीना काळ न त्याते जाची
प्रेमोन्मत्ता हृदयामाजीं राहे कोप न रोध
दुर्गुणता ही करुं शकेना प्रेमशक्तिचा रोध

प्रेमवेदना मुग्ध–प्रणयी सुख निद्रेताचि मस्त
    प्रेम छाबीतें भरोनि दृष्टी पाहे लोक समस्त
फूल पल्लवामाजीं पाही प्रियतम रुप यदा
    प्रेम हृदय तें भरोनि जाते मोदभरानें तदा

° ° ° ° °

प्रेमें करतो मदोन्मत्त तो तेथें प्रेमालाप
    पाहुं कोठवर या पर्णामधि लपून राहणें भाग
क्षुधा क्षुधित तो तृषा तृषित तो आहे प्रेमनिधान
    निराश्रितांची उदासीनता आशा हित निःश्वास

अवनत जाती उन्नत पथि हे काटें करितां दूर
    तृप्त होउनी मानसीं होतो मोद तया भरपूर
दया न ठाव कर्तव्यहि ज्या मुळि न कुणाचा दास
    इच्छा इतुकी कीं मिरवावी प्रेमरुप विकास

प्रेम विव्हला चंद्रिकाच ती झाली अती अधीर
    प्रियकर शोधुनि आणिन वेगें वदोनि सोडी कुटीर
तरंगिणीच्या तीरीं दिसे तिज उदक राशि गभीर
    सतत वाहतो पूर्व दिशेला समय समान अधीर

मध्यान्हाचा समय, भानुचें प्रखर तापलें बिंब
    सरितूदर्पाणि पाहुं लागला भानु आपलें बिंब

रुप गर्विता तरंगिणीचें होतें सुंदर अंग
दृष्टि परी ना तिची त्याकडे शोधि प्रणय-विहंग
शोभा बघतां तरंगिणीची हाय ! लागली ठेस
वेद तरंगिणी ! कुटिले सम गे ! आहे तुझाच वेष

जीवन जीव न हरिला माझा केलें नाथ विहीन
माझे सुख तुज पाहवलें ना तडफडतें मी दीन
पशुपक्षांनीं शोक भरानें त्यक्त मदर्थ विलास
गान टाकले विहंगमानें लता न टाकी श्वास

कर्ण उभारूनि जागोजागीं टाकिति हंस विलास
अन्न पेय ना ग्रहण करीती झाले सकल उदास
सधवा करिती सज्जन सारे विधवा केलें मजला
तिळ न वाटला खेद मुळीं गे पतिहिन करतां मजला

उड्या मारिशी भरा भराभरा तूं आनंदाच्या भारे
गीत गाउनि रिझविशि नाचुन लाज न मनांत मानी
ग्रीष्म हस्तगत लता सांपडे कोठें ? हाय वसंत
पंच बाण मम हृदयीं मारी दिसे न हाय वसंत

सेवा करणे मायभूमिची हीच ‘ प्रतिज्ञापूर्ति ’
घडेल आता कशी प्रियकरा ‘ दिसे न मजला मूर्ति ’
होती आशा जळीं विराली भविष्य ठरलें फोल
कपि करि कधि कां रत्नहि पडतां तयास येते मोल

हाय ! पूर्वकृत पापांचा कां सरे न अजुनी भोग
म्हणुनी कां मज सहन करावा लागे विषम-वियोग
हांक मारिते तुला चंद्रिका कर्णि न कां ये साद ?
लागे कां तुज देश सोडुनी तरंगिणीचा नाद

\+ + +

तरणि तापला भूमि तापली कोमजली फूलवेल
विरहानल हा हृदयिं पेटला जळोनि जाई वेल
अंग जाहलें तप्त तिचे ते हृदयिं लागली आग
शांत होइना म्हणूनी टाकीं जलीं आपुले अंग
दाह निमाला जलीं क्रीडता शांत चित्त ती झाली
बोले, असले आत्मवधाचे पाप मला हे घडले

० ० ०

मानसपूजा केली पतिची मानस दर्शन घडलें
मंगल सुंदर प्रिय पतिचें मज कर्णी गानहि पडलें
सौख्य लाभले या कंठाला प्रिय कर गोड करांचे
कंठ म्हणूनि हा पुनीत झाला अमृत लाभे साचे
काय करावा या अंगाचा त्याग पती ना दिसतां
ज्या अंगांना पुनीत केलें धन्य धन्य ते आतां
मनांत होता देशभक्तिचा त्यांचा अतीव पूर
तीच करोनी मी जगवावी माझी सुंदर नूर

इच्छा पतिची सफल करावी धर्म हाच भार्येचा
स्वदेश सेवा करुनी राखिन धर्म मीच आर्यांचा
ज्या योगानें निजदेशाची सेवा घडेल हातें
तें तें आतां करीन निशिदिनिं तनमन अर्पिन मातें

करी प्रतिज्ञा मनांत असली तीच चंद्रिका रानीं
तोंच दुरुनी कर्णमधुर रव येइ कुणाचा कानीं
ध्वनिच्या मागें धावुं लागलीं वेड्यापरि ती बाला
उठली बसली पुनः पुन्हां ती हुरहुर होय मनाला

हां हा नाथा ! करुं लागली विजनीं वनीं विलाप
ताप तिला तो सहन न होई प्रभो हरी मम ताप
दिशा दिसेना कोण कुठें मी धुंडूं कोठें नाथ ?
तिला कळेना भ्रांत चित्त ती क्रमूं लागली पंथ

भयाण झाली रात्र, पशू ही करी गर्जना थोर
रातकिड्यांची किरकिर त्यांतुनी मनांत पडलां घोर
वृक्षलतांते, पाषाणाते आलिंगी ती कांता
कुठें पाहिला प्राणनाथ कां सांगा विनवी आतां

हिंस्रपशूंनो क्रूर तुम्हांला म्हणणे अयोग्य गमते
कठोर मीही तुम्हां पेक्षां त्यजिलें म्हणूनि पतितें
रानिवनीं तो कुठें असूं ते रक्षण त्याचें करणें
विनवि चंद्रिका हिंस्रपशूतें, सौभाग्याचें लेणें

## सर्ग ३ रा

मार्ग क्रमितां सफल जाहली मुनिची इच्छित आस
धारेमध्यें वाहत्या दिसलें मुनीस युवक-प्रेत
' श्रमावांचुनी साध्य न होतें प्राप्त ' सत्य हें वचन
चणें भाक्षितां लोखंडाचें मिळेल ब्रह्मस्थान

युक्ति विलक्षण कलानिपुणहि होता मुनि सर्वज्ञ
प्रयत्न करता बहु यश आले आला परत प्राण
सजीव होता परी न त्याची झाली मूर्च्छा भंग
श्वास मंदही चालू लागे परी न हालें अंग

परहित तत्पर मुनिवर त्याते आणी पर्णकुटींत
परी न दिसतां तरुणी तेथें झाला मुनि स्तिमित
कुशासनावर निजवी तरुणा धूनी सन्निध साधू
आंगीं उष्णता यावी म्हणूनी प्रयत्नि धरि ना किंतू

० ० ० ० ० ०

पाहि कन्यका मुनिवर आश्रमि परी न दिसली कोठें
एकाकी कशि सोडुनि गेली, धैर्य स्त्रीचे मोठें

० ० ० ० ० ० ०

वाट पाहतां प्रसंग येतो काय अवेळीं साद—
कोकिळ करितां मोल येइ कां वसंत नसतां शांत
प्रेम आंधळें विचार कुठला प्रेमिजनातें सुचतो
नवें नवें नित खेळ सुचवितो प्रेम मयी जनतो
शोध मुनीनें केला परि ना कुठेंच कन्या दिसली
जलीं बुडाली किंवा तिजला हिंस्र पशूनें नेली

० ० ० ० ०

मंत गतीतें त्या तरुणाचा चालुं लागला श्वास
मुनिवर्याच्या थोर मनाची पुरी जाहली आस

० ० ० ० ०

भव्य भाल तें सरल नासिका अजानुबाहू रूप
पाहुनि मुनिला हर्ष जाहला पहा पहा हो खूप

पौरुष बांधा स्कंध वृषासम विशाल वक्षस्थलही
सहज मनोहर रुप पाहुनी हर्ष मुनीच्या पोटीं
भव्य भाल तें दिव्य तेज ही पाणिदार हीं नयनें
मदनासम ती कांती बघतां हर्ष कोण ना मानें
दिव्य तेज तें दिव्य रुपहीं भव्य देखणा बांधा
सहज सांगतो लाखामध्यें पुरुष असे हा बिंडा
नसानसांतुनि चमकत होता नूर पहा तरुणाचा
तेज तयाचें सांगत होतं ब्रह्मचारि हा साचा
शरीर त्याचें सांगत होते हाच संयमी पुरुष
देशकार्य हा करील जन्मुनी सार्थक या जन्माचें
स्वदेश सेवा व्रत हा धरितां सुयश मिळे संशय ना

० ० ० ०

तिथें पाहिजे जातीचे हो शक्य न ते इतरा
तरुण पावला संज्ञा तेव्हां स्मरण करी तरुणीचें
म्हणे प्रियलगे ! प्रश्न तुवा मज केला होता मागे
प्रेम असे मम दोघांवरिही जिवलग उभया देश
कोणाकरितां त्याग तुझा हा, मी आवडतो कां देश ?

० ० ०

माझ्या संगे तूंही असतां तुच्छ जगत सारे
करूं उभयतां मिळुनी चल तूं जागृत जन निजलेलें

गहिंवर आला दाटुनि तेव्हां तरुणाच्या हृदयांत
प्रणाम केला गुरुवर्याते हृदयहि होतें क्लांत
प्रणाम केला मुनिवर्यांनें हात जोडुनी देवा
कृतज्ञ देवा तुझा असें मी मजला दिधला ठेवा

० • ० ० ० ० ०

हळूहळू त्या तरुणाची मग झाली मूर्च्छा दूर
प्रसन्नमुख तो उठोनि बसला हर्ष मुनीतें फार
आहे कोठें मी गुरुवर्या कोणाचें हें स्थान ?
कोण दयालु अहा तुम्ही हो नाहीं मजला भान

× × × ×

बोले ऋषिवर वाहत आली जलाशयीं तव काया
माया प्रभुची अगाध आहे, जन्म तुझा ना वाया
अतिश्रमानें जीवदान तुज लाभें देवदयेनें
पुलकित झालें शरीर मम हे अतीव आनंदाने
प्रभात झाली कुठें चंद्रिका स्मरण तया आले
जलीं बुडाली किंवा काननिं पशुनें भक्षण केलें
मुनिवर्या ! मज सांगा सांगा वाहत आला देह
दुजा कुणाचा तरंगिणीवर जिच्या जिवा मम मोह
मौन मुनीनें धारण केलें कथिली मुळीं न वार्ता
तरुणासी मुळि ओळख दिलि ना, काय जाहली कथा

मराठी ग्रंथ ... दा. क्र. ९३८१ ... शाखा स्थळ

भ्रमित चित्त हा होईल म्हणुनी अंग काढिलें मुनिनें,
वार्ता तिळ ही कथिली नाहीं तरुणीची त्यानें
केला होता प्राण समर्पण आपण जलामधें कां ?
तरुणी होती कोण दुजी कीं, प्राणप्रिय नौका
काय कथूं मी मुनीवर्या तुज माझी करुण कहाणी
विचित्र आहे विधिघटनाही परी सांगतो थोडी
आज्ञा म्हणुनी कथा सांगणे भाग मला हे साधो !
विस्तृत जरि ना संक्षिप्तचि तुज कथितो कहाणी साधो

० ० ० ० ०

" परम दयाळू परोपकारी पिता मदीयाचि होता
प्रेमळ देशा भूषित होता गुणी धनाढ्यहि दाता
बालपणीं मम वियोग झाला मातेचा मुनिवर्या
सर्वस्वहि मम जनक चालवी माझी दिनचर्या
असुर माजले होते जगतीं एकाचि हाहा:कार
दिवसाढवळ्या करीत होते कपटी अत्याचार
आज पळविली स्त्री दुष्टानें काल घेतला जीव
अपराधाविण कितीक छळले मनीं दया ना कींव
अन्नावांचुनि गरीब मरती चाले यांची चैन
दिपावली ती थोर नृपांना, रंका अन्न न पान
दुर्वार्ता ही कर्णीं पडतां, पितां तळमळे अंतीं
तत्पर झाला गोरगरीबां हात द्यावया अंती

वनवन फिरला गांवोगांवी जनांस उपदेशी
तरुणांनों ! कां उदास होतां संघशक्ति ना देशी
संघशक्तिनें चूर्ण होय हो विपत्ति पर्वतराशी
उठा वीर हो आळस सोडा देईल देवहि आशी

सभा भरवितां असुर तापले बद्ध पित्याते करिती
मिथ्या दोषी ठरवुनि त्यासी शिक्षा दिधली त्यासी
नीति टांगली वेशी खलांनीं त्रस्त पित्यातें केलें
प्रमाणपत्रें किती दाविलीं निष्फल सर्वहि झालें

शस्त्र घेउनी अंग कापिती लवण घालिती त्यांत
प्राणि विषारी कितीं डसाविती देती दुःख अनंत
अर्थ दंडहि केला इतुका रसातळाते जनक
गेला सांगू किती तुम्हां ते गोष्टी त्यांच्या कैक

सळो पळो कीं केलें जनका त्या असुरानें फार
लेश सुखाचा मिळे न जनका यवन माजले फार
माझ्या नगरासान्निध आहे साधुवर्य गुरुरत्न
आदर होता पित्यास त्यांचा, गुण हो पूजा स्थान

असुरताप तो सहन न झाला माझ्या पित्यास जेव्हां
अर्पण केलें तुळसीपत्रहि माझ्या जनकें तेव्हां

× × × +

घेउनि स्कंधीं जनक मला तो निर्जनिं विपिनीं येई
त्या साधूच्या पदीं अर्पुनी मजला निघूनि जाई
अत्याचारा मुळीं न सीमा जगीं राहिली कोठें
विवस्त्र करिती सती स्त्रियांना घेती अब्रू खल ते
दिवसा ढवळ्या गोमातांची आर्य जनांची मान
कापित होते कुणा न तिळही देती खल ते मान
प्रजाविरोधी नीच असुर ही नाचति आनंदानें
भाषा, वेषा भिन्न जाति ही कुणी सुखी कां त्यानें ?
रोमरोमिं हो संतापाचा कळस जाहला साचा
ज्वालामुखि तो धुमसत होता हृदयीं आर्यांच्या
प्रजा नष्ट हो, होतें तेव्हां निश्चित जगतीं क्रांती
अत्याचारा नष्ट करिन मी नांदो देशीं शांती
आपण मजला गुरुस्थानि हो मानी बंधु समान
आज पासुनी पुत्र दिला मम देशाकरितां दान
शिक्षण द्यावें देशभक्तिचे आज पासुनी पुत्रा
करील सेवा देशाची हो शिक्षण ऐसे द्या, या
तारुण्यीं हा येइल तेव्हां निरोप माझा सांगा
स्वतंत्रता हें ध्येय असावें तदर्थ जीवित त्यागा

० ० ० ० ०

निरोप देउनि गेला टाकूनि पिता सदन तो कोठे
तेव्हां पासुनि पर्णकुटीं या वसती माझी दिसते
कनिष्ठ होती साधूची त्या अेक कन्यका सान
शिक्षण दिधलें गुरुवर्यांनीं दोघांनाहीं छान

खेळत होतो दोघे सदनीं; शिक्षण तैसें गान
भिन्न देह हे होते अमुचे अेक परी ते सुमन
काल लोटला अंतकाल हो सन्निध आला गुरुचा
दीप मावळे त्या कुटिराचा, पगडा होय तमाचा

हांक मारिली गुरुनें मजला सांगितला संदेश
मदिय पित्याचा आम्हां उभयां केला बहु उपदेश
कन्यापाणिग्रहण करविले मजला गुरुनें समुद
सहर्ष ठेवी देह आपुला, आम्हां दोघां खेद

मुनिची आज्ञा म्हणुनी जरि मी प्राणिग्रहणा केलें
गृहस्थधर्मीं परी न बनलो, तरुण, मुनीसी बोलें

° ° °

प्रेम चंद्रिका करीत होती माझ्यावरि निः शंक
परी न विसरें भाव पित्याचा होता जो ह्रदयांत

° ° °

जोवरि देश स्वतंत्र हो, ना, मिटे न अत्याचार
तोंवरि राही संयमीच मी ब्रह्मचारी निर्धार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
२१९२२ वि: ७०१
क्रमांक ... नों: दि: ...



जीवन जोवरि पूर्ण ‘ प्रतिज्ञापूर्ति ’ खचित करणार
दुःख परंतु हेंच मला कीं चंद्रिकेस मुकणार
तिची मनीषा मिळूनि देश स्वतंत्र करणार
वृक्षामागें छाया जाई कोण रुद्ध करणार ?

बोल परिसुनी मुनिवर-नयनीं खळखळ अश्रू वाहे
धन्य धन्य हा युवक ईश्वरा ! कष्ट कितीतरि साहे

० ० ० ० ० ०

कशी करुं मी स्वदेश सेवा मार्ग कोणता दावा
दावा धरिती नीच असुर ते; नाश तयांचा व्हावा
विघ्नें येतिल अनंत मातें सांगा कशीं निवारुं ?
अनुभव अपुला मला कथावा कसा हकावा तारुं ?

० ० ० ० ० ० ०

मुनिवर बोले काल तुला ना आहे हा अनुकूल
अपुलें आपण दुजे न वैरी काल असा प्रतिकूल
सुवर्ण भूमी म्हणूनि आम्ही मानित होतो मानें
मान खंडना तिचीच झाली गांजे दारिद्र्यानें

नरक बरा हा याहूनि वाटे, दुः ख न तेथें इतुकें
नीच पहा हें छळित आम्हां, कोण छळाते टिके
अन्न न पाणी वस्त्र तसें ही मिळे न तिळही आम्हां
तिळ विश्रांती घेऊं म्हणावें, सदन कुठें ही धड ना

अर्ध पोटिं ते कितीक मरती, गणति न त्यांची तेथें
सौख्य कशाचे लागावें त्या, करा कल्पना तेथें

° ° ° ° °

खोल नेत्रही गाल खोदही उदर खोल ही दिसतें
तारुण्याचें तेज न वदनी, वाटें प्रेत दुजें तें
चौर्य वाढलें नीति विघडली जारिणि होती ललना
अन्नावाचुनि तडफडती किती देवा ! कांहिं सुचेना

° ° ° ° °

स्वतंत्रता ना लाभे तोवरि सौख्य स्वप्नि नाहीं
कनक-पंजरीं मिळे खावया, स्वतंत्र राघू नाहीं
गुलाम आहे सुगंधमयही सुंदरही दिसण्यांत
परंतु कंटक बोंचति मधुनी, गूढ कळे कां यांत ?

नादि लागतां लोक तयांच्या कुरवाळिति त्याते
कंटक परि हें टोचायाचें कुठें कधीं कां राहते ?
परि ना बाळा ! उदास होणें मनीं धरी विश्वास
प्रयत्न करितां ये जिंकाया सकल याच विश्वास
विघ्नें येतिल कितीक परि ना हताश होणें अंतीं
वृक्ष कडाकड कडकडती, परि अखंड पर्वत राहती
विघ्नें येतां चित्त ढळेना धीर धरावा खाचित
तिमिरानंतर प्रकाश येतो, असें बोलती संत

तोंड संकटा देतो तो नर, कार्य घडे तत् हस्तें
साहसाविण कां कुणी पावतो कनकैश्वर्यातें ?

० ० ०

देह पडो हा मृत्युमुखीं परि कर्तव्या ना सोडी
अमर तोच हा जगी म्हणावा, देव हात त्या जोडी

० ० ० ० ०

जा तरुणा तूं देशहिताचें कार्य करी निःशंक
मिळेल फळ तुज ईशकृपेनें हेंच सांगतों अेक

० ० ०

करी जागृती त्रस्तजनामधि, भीति घालवी त्यांची
वीर संग्रहीं सदैव असतां कार्य होय हो सफल

देश स्वजनीं मनि न धरावा स्वधर्म कधीं न त्यागी
देशासाठीं प्राण त्यजावा खरें बनावें त्यागी

कार्य करावें शांतपणानें नको बोलणें वाया
वाया त्याचा बोल गणावा जों न करी हो कार्या

देशभक्त जो असतो त्याचें उदार मानस फार
कंटकशय्या परि त्या वाटे केवळ सुमनाहार

विचालित त्यांते करुं शकेना विघ्नांचा ही राशी
अभ्राच्या कां भीतीनें हो पळेल तेजोराशी

० ० ०

शुभवेळा ही गुरो ! सोडि मी पर्ण कुटीचा वास

० ० ०

प्रसंग येतां भेट देइ मी, सत्पुत्रा ! तुज खास

० ० ०

मंगलमय हो ! पंथ तुझा बा ! लाभो तुज यश कीर्ती

तुझी 'प्रतिज्ञापूर्ती' होईल फुटो, अमंगल मूर्ति

## सर्ग ४ था

प्रेमवेडि  ती भटकत होती रानोरानीं तरुणीं
        परी न दर्शन चंद्राचें हो जरी चांदणी होती
वनोवनीं  ती हिंडत होती गाउनि प्रेमालाप
        अरण्य रोदन परी जाहले होय शरीरा ताप
कुसुमलता ती तरुराजावर करीत होती प्रेम
        पशुपक्षांचीं मनांत होती आवड तिजला खूप
मार्ग चुकोनी आली तरुणी अेका गांवाजवळ
        प्रभात होती रम्य परी ती, उदास होतें गांव

० ० ●

हेमंताचे दिवस माघचा होता महिना शीत
　　कांपत होते दीन थंडिने वस्त्रहीन भयभीत
शय्या भूमी, वसन दिशाहि भोजन ज्ञानामृत तें
　　साधू परि ते कंठित होत काळ रंक सदनांत
अन्नावाचुनि प्राण तयांचे होती कासावीस
　　प्राण देउनी मुक्तचि व्हावें, मिळे न खाया वीष
तुहिन पीडितां जनता झाली, वज्र बरें जरि पडतें
　　दांत करकरा वाजति त्यांचें, शब्द वदूं न शके ते
अेकमेक ते बोलु लागले गतजन्मीचें पाप
　　उदया आलें, म्हणूनि होतो असला अंतस्ताप

○　○　○

द्वारीं अेका बसला होता सचिंत अेक अतिदीन
　　गृहिणी होती दुःखित सदनी होती वस्त्रविहीन
बालक होते, परि न तयासी वस्त्र झांकण्या शरिर
　　मांडिवरती कुडकुडुनीया झालें शरीर गार
भूमीवरती झोपत होते तिथें सदाचा वास
　　कितीक दिवसापासुनि होता जाणें ना उपवास ?

○　○　○

फिरत चांद्रिका आली तेथें थर थर भरला कंप
　　सूं सूं वारा वाहुं लागला हिममय झाला प्रांत

रंक द्रवला हाल बघुनी तरुणीचें थंडीनें
    परी करावें काय तयानें पीडित दारिद्र्यानें ?

० ० ०

घरांत गेला वस्त्र फाटकें आणि दरिद्रि वेगें
    ' बाई ! यावर बसा ' प्रार्थितो, ' थकोनि गेलीं अंगें '
गोळा केली चार काटके दिली पेटवुनि त्यानें
    बोले " माई ! शेका आता, " दीन बोलला वाणी
गरीब होता परी तयाचें उदार होतें हृदय
    लक्ष्मीपति परी उदार नसतां मानिति त्यासी काय ?
धन्य गृहस्थाश्रमी म्हणावें खरेच मजला गमते
    कितीक जगतीं माणिक असती मोजा बोटावर, ते

० ० ०

जवळ बसवुनी त्या दीनातें बोले तरुणी रंका
    कारण सांगा दैन्याचें मज सोडुनि सारी शंका

.... कथा ....

दीन बोलला काय कथूं मी होतो शेतकरी
    शेती करुनी कंठित होतो जीवन दोघे आम्हीं
प्रेम तिच्यावर, प्रेम सुतावर, शेती होती छान
    होतो कंठित काळ कसा तरि मुळीं न खावया वाण

० ० ०

अेके दिवशीं राज सेवकें धरूनि नेले आम्हां
म्हणे साक्ष दे विरुद्ध खोटी, ना तरि मोडू माना
प्रयत्न केलें नानापरिनें विरुद्ध द्याया साक्ष
परि मी वदलो 'मला नावडे अन्यायाचा पक्ष'

क्रोध अनावर झाला त्यांचा केला अत्याचार
अन्न, वस्त्र धन लुटूनि नेलें, होतें तितुकें पार
तेव्हांपासुनि होय दरिद्री नित्य घडे उपवास
क्षुधा गांजितें कुटुंब सारें भूमीवराति उदास

० ० ०

करुण कहाणी सांगत होतां गळे टपटपा नीर
तरुणी तीही रडे ढळढळा मुळि न राहिला धीर
शरीर याचे किती खंगलें झाला जगतीं दीन
धन्य धन्य परि औदार्याची तुटली परि न कमाल

० ० ०

'सेवा यांची मला घडावी' वदले होतें नाथ
हीच 'प्रतिज्ञापूर्ति' करि मी उद्धरि दीन अनाथ
दीन गांजलें रक्षण करणें असुरापासून हाच
हेतु मनीचा पूर्ण करिन मी खचित सत्य हा साच

० ० ०

कृतज्ञ आहे या दीनांच्या, मनीं घडविली क्रांती
'आजपासुनी दीन रक्षणी मरेन देशासाठीं'

वनीं पाहतां प्रियकर माझा तिथें न त्यांचा वास
        लोकहृदयिं हा वसे निरंतर, तिथें पहावे खास
प्रियकर वदला होता वदनीं अमोल जे कां बोल
        जनी राबतां, मानवतेला अमोल येतें मोल

× × × +

आश्वासन मनिं दिधलें तरुणा, तरुणी तेथुनि उठली
        गावोंगावी दैन्य जनाचें पहावयातें गेली
करी प्रतिज्ञा तरुणी तेव्हां 'देशोद्धार कराया'
        तन-मन-धन तें देशासाठीं प्राण खास अर्पाया
ज्ञान दान तें हिरोनि नेलें वंचित केलें देशा
        हाय ! हाय ! रे राज्य करीती अन्न न खाया देशा

० ० ० ० ०

काया तेव्हां तिनें बदलली सेवा नित्य कराया
        तिला न दिसला अजूनि स्वप्नीं प्राण प्रियही राया
अलंकार नी तलम अंबरें तिनें टाकिलीं सारीं
        संन्यासिनिचें रूप घेतलें देशासाठीं भारी
देशोद्धारासाठीं धरिला हातीं तिनें त्रिशूल
        देश भरावा अंगानें ही मरून त्याचा शूल
गांवोगावीं जाउनि केला तरुणांना उपदेश
        जागृत केला देशाचि जो कां झोपे माजीं चूर

वक्तृत्वाचा ओघ चालतां डोले फणिवर तैसा
लोक पहा तो डोलूं लागला परिसुनि तत् उपदेशा

० ० ० ० ०

वक्ता तोच म्हणावा श्रोत्याचें हालवील जो हृदय
वक्तृत्व थांबवूनी श्रोते वदती बनूं नका अदय
श्रवणाचें रसपूरण पाते लवते मुळीं न नयनाचे
नाचे हृदय फणीवर कानीं पडताच बोल वदनाचे
निद्राश्रम दुःखादिक यांचें होते तिथेंच विस्मरण
मरण बरें ! परि उठणें येथुनि वाटे, बरे न आमरण
वक्तृत्वानें तरुणीच्या या भारित झालें लोक
भुजंग डोलें नाद अेकतां गारुड्याचा खूप
उत्साहाचा भरूं लागला रोमरोमिं तो जोर
जागृति झाली नसानसांतुनि देशासाठीं थोर
रसपूरण ही श्रवणाचें हो लवे मुळी ना नयन
'हृदय फणीवर डोले हर्षें,' असें असावें वचन
पशुपक्षादिक गुंगत होतें श्रवणीं पडतां बोल
मानव डोलती नवल मुळीं ना श्रवणा येतें मोल
मोहमयीं ती वाणी अैकुनी गुंग जाहलें लोक
सौख्याचा नच वारा होता, करीत होते शोक
वक्तृत्वाचा प्रभाव असला, शूर साहजी जनता
बनली, जी कां दावित होती नैराश्याची जनिता

० ० ० ०

मरणासाठीं आनंदानें झाली जनता राजी
वक्तृत्वाचा तरु लाविला, सुमनें आली ताजी

० ० ०

बोल परिसता युवती मुखिचें उदार झालें प्राणा
देशासाठीं मरुं सकलही घेती ऐशा आणा
देवी तिजला म्हणूं लागलें, नमूं लागले सारे
उन्नतिचा हा अचल लाभला पहा उलटले वारे
गावोंगावीं करुं लागलीं देवी मंगल गान
तन्मय जनता झाली सारी परिसुनि सुंदर तान
प्रेमजलाचें जल सिंचन हें पडतां अंकुर फुटलें
परोपरीं तै, वृक्ष वाढती देशोद्धारा फुलले

० ० ० ० ०

स्वतंत्रतेचें बीज पेरलें हृदयिं जनांच्या खोल
त्या तरुणीच्या परिश्रमाला आलें समयीं मोल
माझ्या नगरा सान्निध होते मुनिवर ऐशा काळीं
धर्माकरितां देशाकरितां श्रमुनी सांज सकाळीं

० ० ० ० ० ०

जागृत झाली जनता सारी दिव्य करायाते
करुं सहन ती देशासाठीं विपत्ति हिमाचलाते

० ० ० ० ० ० ०

देशप्रेमा-साठी धडपड करुं लागले सकल
'आम्ही देऊं प्राणाचीही दिव्य आहुती विमल'

स्वतंत्रतेस्तव आतुर झाली जेव्हां जनता सारी
विजातियांच्या धडकी भरली हृदयांमध्यें भारी
क्रोध वशानें कपटी खल ते दलबल सहित अपार
करु लागले जागृत हृदयीं भीषण अत्याचार

० • • ० ० ० ०

धरा चंद्रिका, चंद्र मुनीला, करा तयासी ठार
गांवोगांवीं नीच खलांनीं केला अत्याचार
ज्वालामुखि तो धुमसत होता, स्फोट जाहला त्वरित
जनता अग्नी ओकुं लागली होरपळे रिपु चित्त

प्रजा निघाली नगरामधुनि क्रोधित सिंह समान
मायभूमिच्या स्वातंत्र्यास्तव करावया बलिदान
तरुण मिळाला येउनि त्याते द्विगुणित झाला मोद
नसांनसांतुनि स्वातंत्र्याचा घुमूं लागला नाद
वैर विसरलें तत्पर झालें लढावया बंधू
स्वातंत्र्याचा विडा उचलिला तरावया सिंधू
शत्रु धावले बघतां यांची संघशक्तिची लाट
तुटोनि पडलें क्रुर, प्रजेवरि पहा पुरविली पाठ

पूर्वज तुमचे होते कसले षंढ तुम्ही कां बनला ?
उठा उठा हो ! स्वातंत्र्याचा दिनमणि उदया आला
प्रजा निघाली मर्दाया ती मत्तमतंगज रिपुला
धडकी रिपुनां भरली हृदयीं पळूं लागले विपिना

रक्त प्रजेचें सळसळलें तें वीर रसाच्या योगें
करीं घेउनी स्वशिरें अपुली तुटूनि पडले वेगें
सम्राटाचे सैन्य विपुल तें प्रजा अल्पशी दीन
डगमगली ना तिळही परि ती संख्याबल जरी हीन

हतबल झाली प्रजा धैर्य तें विगलित झाले जेव्हां
योग्य समयि त्या धांवुनि आले मुनिवर तेथें तेव्हां
सिंहगर्जना पडली कर्णीं, प्रजेस आला धीर
तुटूनि पडले शत्रुदलावर, अल्पसंख्य ते वीर

× × × ×

संन्यासिनिचा वेष घेउनी स्थानिं चंद्रिका आली
हीन दीनशी प्रजा घेउनी प्राण द्यावया आली
शत्रु पळाले धैर्य पाहुनी प्रजाजनाचें अमित
सागर फुलता सिकता सेतू टिके काय हो तेथ

चंद्र आमुचा क्लांत जाहला रक्त तनूतुनि वाहे
मंथन रिपुचें करावयातें प्राण परी तो राहे
संधि साधुनी शत्रू धांवला तरुणा वार कराया
मुनिवर पडला मधें प्रसंगीं छाती अपुली द्याया
अवसर मिळतां तरुण धावुनी उडवि रिपूचें शीर
मुनिवर पडलें धरणीवरती, दुभंग झालें शरीर

० ० ० ० ०

इकडे रिपुंना जर्जर केलें तरुणीनें हो फार
रिपुसेनेच्या मधें जाहला एकचि हाहाःकार
प्राण घेउनी पळूं लागली सारी रिपुची सेना
रंक धावले पाठोपाठी जर्जर केलें त्यांना

० ० ० ० ०

सीमा नुरली आनंदाची मुनिच्या नयनीं तेंव्हां
वदे आज मी खरा सुखी हो कारण देश सुखी हा
मेघपटल ते निघूनि गेले, माता शत्रु विहीन
स्वातंत्र्याचा सूर्य उगवला गेले सुखीहि दीन

० ० ०

अजिंक्य जाहला देश आमुचा शत्रु निमाले सारे
विजय सदा हो, भारतभूचा संशय यांत नुरे
चंद्रचंद्रिके ! केली तुम्ही आज प्रतिज्ञापूर्ति
स्वदेश सेवा तत्पर म्हणूनी तुम्ही उभयमूर्ति
धन्य भाग्य तव सत्पुत्रा बा ! जीवन सफलहि केले
कुलदीपक तूं जगीं गाजला, नशीब उदया आलें

० ० ०

शांति सुखाचर स्वाद घेउनी प्रपंच करणें आतां
तरुणी घालिल माळ तुला ही सत्य समज हें चित्ता
कोठें गेली तरुणा परि ती ठावे कुणा न मुळिही
स्नेह भाव तो तिचा प्रगटला भेटे येउनि तीही

निष्फलता ना सत्प्रेमाला जगीं असें हें सत्य
अपूर्णता ना सत्प्रेमाला पूर्णाचि तें नित्य

० ० ०

सत्प्रेमाला खरी जागतें आर्यांची ही ललना
प्राण जाय परि शील न सोडी; संशय यांत मुळीं ना
जुल्म करितें, सहन परी ती सहन करि न अन्याय
उभा जन्महि कष्ट सोसुनी, टाकिल परि ना न्याय
अशा स्त्रियांना छळिती पति जे जोडिति परदारे ते
जिवंतपणिं ते नरकीं पडती, काय सौख्य त्यातें ?
पापी आपण, परि पत्नीते जारिणि म्हणती नीच
नीचताच ये अशा पशूंना, त्यांस योग्य हानी च
संभावित हे कितीक असले फिरति राजरोस
लाज परी ना आम्हांला हो मानहि देतां त्यांस

० ० ०

मान कशाला अशा खलांचा नित्य करा उपहास
मान देईका सुजन कधीहि शीलही ज्या तिळ ना
विद्वत्तेहुनि मानमान्यता शीलाते हो अधिक
शील राखणें आर्यांचें हें ब्रीद असें खचित

० ० ०

सत्शीलाची खाण अशी ही भार्या तुज लाभे
पाणिग्रहणा अता करावें, चंद्र चंद्रिका शोभे

° ° ° • °

पिता तुजा बा! सत्पुत्रा मी ओखळ तुला पटेना
बाल्यीं असतां विलग जाहलो माझ्या पंचप्राणा
सुखें चंद्रिके सवें करावा करावा देश सुखी हा चंद्रा!
येतो आतां निरोप द्यावा घेतो अंतिम निद्रा

° ° °

प्राण जाहले गोळा माझे शब्द न आतां निघती
देशोद्धरणीं तत्पर जे कां, त्यांना माझी प्रणती
देवा प्रिय ते वीर जगी जें करिती जनहित सेवा
रणात्रांचुनी स्वातंत्र्याचा मिळे न कोणा मेवा

जयजयकारें करा गर्जना भारत देशाची
बोलुनि ऐसे देह ठेविला, धन्य मुने तुमची
शोकें तेव्हां विकल जाहला सत्पुत्रा ना भान
धन्य पित्याचें प्रेम अर्पिला देश सुतास्तव प्राण

माता पितरें अशीं लाभतां, तनयाहि चंद्रासम हो
तरुणी भार्या चंद्रिका समा धन्य गृहस्थाश्रम हो
पूर्वज सुकृताविना न लाभे प्रपंचि असला लाभ
सगुण चरित्रे गावयास नित देता, देवा लाभ

# सर्ग ५ वा

कानन होतें तीच कुटीं ती होती तीच दुजी ना
स्वातंत्र्याचा सूर्य तळपता सौख्य न हो कोणा ?
मूर्च्छित अंकीं तरुण तरुणिच्या पडला होता शांत
चंद्रिकाच ती शांत करिल त्या, शंका तिळ ना यांत

प्रेम पीयुषें सिंचन करतां चळवळ चाले थोडी
गान परिसतां त्या तरुणिचें, दोन्हीं नयनें उघडी
दृष्ट भेट ती झाली त्यांची काढूं दृष्ट तयाची
स्वातंत्र्यास्तव झटले दोघे धन्य धन्य हो त्यांची

लाभ मिळावा स्वातंत्र्याचा हीच प्रतिज्ञापूर्ति
सुफल जाहली, कव्या म्हणूनी नांव ‘ प्रतिज्ञापूर्ति ’
देशास्तव जे प्राण अर्पिती विस्मृति ना हो त्यांची
‘देव’ घालितो प्रेमभरें त्या माला सुमनाची

शिवरात्रिचा दिवस आज हो पूर्ण प्रतिज्ञापूर्ति
शिवास वंदी ‘देव’ न अशिवा हृदयिं ठेवुनी मूर्ति



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१९२२ ... विः ...
क्रमांक ... ९३५४ ... नोंः दिः ...

# देवकन्या पुष्प १ लें

## विद्वान रसिकांचे अभिप्राय

सहज परिचयास व गावयास ही **देवकन्या** गोड आहे. श्री. देवांचीं इतर पुष्पें व चरित्रें अशीच प्रसिद्ध झाल्यास, ती महाविद्यालयातूनहि अभ्यासक्रमातून गोंवण्यासारखी आहेत, काव्यात प्रसाद आहे.

**प्रा. शं. बा. दांडेकर, संपादक प्रसाद, पुणें २**

शुचिता, गेयता, कल्पनाविलास, व प्रासादिक शब्दरचना इत्यादि गुणांमुळें ही देवकन्या रसिकांस निश्चित रंजवील यांत शंका नाहीं

**—डॉ. शं. दा. पेंडसे**

श्री देवांच्या काव्यात प्रसाद असून वर्णनें अत्यंत रसाळ आहेत. मराठी भाषेंत यांचीं 'देवकन्या' सदैव तळपत राहील.

**--बा. दा. गोखले**

श्री. देवांच्या 'देवकन्या,' आपल्या देखणेपणामुळें, मोहकपणामुळें व शुचितेमुळें शोभादायक दिसणाऱ्या थोड्याशा अल्लडपणामुळेंहि रसिकांचीं मनें आकर्षित करतील. त्यांच्या पित्याला, त्यांच्या भवितव्याबद्दल चिंता करण्यांचें कांहींच कारण नाहीं असें मला वाटतें.

**--लोकनायक मा. श्री. अणे**

राष्ट्रोद्धाराची तळमळ व संवेदनशील मन यामुळें साहित्यांतील सत्यम्, शिवम्, सुंदरम्, या त्रिविध प्रकारातील आविष्कार देवांच्या बहुतेक कवितांतून दिसून येतों.

**'विवेक' औरंगाबाद**

दोन शब्दीं नव्हें, दोन अक्षरीं काव्यांचा आज सुळसुळाट झाला आहे अशा वेळीं श्री. देवांचीं 'देवकन्या' हा काव्यसंग्रह प्रौढ भाषेमुळें, गेयतेमुळें व जीवनांचें दर्शनामुळें अत्यंत सरस वाटतों.

**प्रा. देऊळगांवकर, गुलबर्गा**

# श्री. संत भटजी बापू महाराज

## (देवकन्या पुष्प २ रें)

### विद्वानांचें अभिप्राय

श्री. देवांचीं कविता सुबोध असून रसाळ आहे. दीन दलितांच्या दुर्दशेचें यांत हृदयस्पर्शी वर्णन आहे. यांत जीवनदर्शन घडतें.

संताच्या शिकवणीचा श्री. देवांच्या मनावर दृढ संस्कार झाला आहे. हें चरित्र त्यांचेंच गोड फळ आहे. श्री. देवांच्या हांतून देशाची, देवाची व धर्माची, अशीच उज्वल काव्यमय सेवा घडावी, हेच माझें परमेश्वराजवळ मागणें आहे. काव्य फारच रसाळ आहे.

लोकनायक मा. श्री. अणे

' चमत्कार करील तोच संत ' ही भावना श्री. संत भटजी बापूंच्या चारित्रांत मुळीच नाहीं म्हणून, जुन्या व नव्या पिढीलाहि, हें देवांचे काव्य, मार्गदर्शक होईल; त्यांत प्रसाद व प्रतिभा आहे.

—त्र्यं. कृ. तर्टे, सोलापूर

श्री. देवांचीं दोन्हीं काव्यपुष्पें मी वाचली. पुस्तक संपेपर्यंत हातांतून सोडवत नाहीं, त्यांत प्रसाद, ओज व माधुर्य आहे तीं शाळांतून व वाचनालयांतून घेण्यास उपयुक्त आहेत.

—ना. वि. आगाशे

इन्स्पेक्टर, शिक्षण खाते

(अुस्मानाबाद) धाराशिव

श्री. देवांची भाषा सोपी,व प्रासादिक आहे. आज'' मृदंगो मुखलेपेन करोति मधुर ध्वनिम्'' हाच सर्वत्र अनुभव येतो. अशा परिस्थितींत, स्वयमेव मृगेंद्रता या न्यायानें देवाचें धाडस स्पृहणीय आहे.

' विवेक ' साप्ताहिक मुंबई

श्री. देवांचीं दोन्ही पुष्पें वाचनीय असून त्यांत नाविन्य व प्रसाद आहे मत्सर, जीवन, या कवितांनीं उच्चांक गांठला आहे.

संपादक सकाळ, पुणें

पांचट प्रेमकाव्याला, चटावलेल्या, कांहीं नवमतवादी तरूणांची, हें काव्य वाचून निराशा होईल. पण खरा देशाभिमानी, चारित्र्य संपन्न व सहृदय वाचक मात्र यांत समरस होईल. काव्यांत प्रसाद, माधुर्य व ओज आहे.

—संपादक याज्ञवल्क्य, नाशिक

श्री. देवांची तिन्हीं पुष्पें सरस उतरलीं असून, त्यांतील काव्यगुण पाहून रसिकास आनंद वाटेल, यांत शंका नाहीं. या उतार वयातही ते इतकी सुंदर रचना करतात, व आपली प्रतिभा जागृत ठेवतात हें अभिनंदनीय होय.

—श्री. मुरलीधरराव घाणेकर
डे. डायरेक्टर, शिक्षण विभाग (औरंगाबाद)
(मराठवाडा) मुंबई राज्य

वाचें बरवें कवित्व । कवित्वीं रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्व । स्पर्श जैसा ।

यामुळें देवांच्या काव्यांत, प्रसार, प्रतिभा व रसाळपणा आला आहे

धुंडा महाराज देगलूरकर, पंढरपूर

REFBK-0009391
REFBK-0009391
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम २१९२२ वि: काव्य
क्रमांक १३५८ नों: दि: २५.११.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३९१

